**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १४२ | शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334


# जशास तसे उत्तर दिले जाईल?

## आ. संग्राम जगताप यांनी सडेतोड उत्तराने घेतला विरोधकांचा समाचार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर : उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे स्वयं घोषित नेते खा. संजय राऊत यांना आताही कोठूनच प्रसिद्धी मिळत नसल्याने ते स्वतःचा टीआरपी वाढवण्यासाठी वादग्रस्त विधान करतात. ज्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत, असे खा. राऊत यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपात ईडीचा प्रसाद घेत अनेक महिने जेलमध्ये काढले आहेत. त्यामुळेच सर्वजण त्यांना भ्रष्टाचारीच दिसत असल्याने ते रोजच असे फालतू व खोटे आरोप करत असतात. त्यांना माहिती देणारे अनेकदा तोंडघशी पडले आहेत. त्यांच्या अशा खोट्या आरोपांना भिक न घालता अहिल्यानगरचा विकास हा असाच वेगाने चालू ठेवणार आहे. त्यांनी कितीही खोटे आरोप करून विकासकाम ांमध्ये खोडा घालून थांबवण्याचा प्रयत्न केला, तरी कामे थांबणार नसून अशांना जशासतसे उत्तर दिले जाईल, अशा शब्दात अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप यांनी सडेतोड उत्तराने विरोधकांचा समाचार घेतला.**

खा. राऊत यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत अहिल्यानगरमध्ये महानगरपालिकेने ३०० ते ४०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याच्या आरोपाला आ. जगताप यांनी काल, गुरुवारी मुंबईतून उत्तर देत खा. राऊत व विरोधकांना टोले लगावले आहेत.

आ. जगताप म्हणाले की, आमच्या माता भगिनींसाठी रोज टीव्हीवरील मनोरंजनात्मक सिरीयल असतात. तसे खा. राऊत यांचे रोज सकाळचे वक्तव्य व आरोप हे सर्वांसाठी मनोरंजनाचे साधन असल्याने



त्यांना फार कोणी गांभीर्याने घेत नाही. सत्तेत असताना त्यांना कोणताच विकास करता आला नाही व आताही कोठूनच प्रसिद्धी मिळत नसल्याने ते आमच्या सारख्या काम करणाऱ्यांवर असे खोटे आरोप करत प्रसिद्धीच्या झोतात येत आहेत. अहिल्यानगर महानगर पालिकेत ३०० ते ४०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा साक्षात्कार खा. राऊत यांना झाला आहे. मात्र त्यांनी ज्या कालावधीत हा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. त्याकाळात तुमच्याच शिवसेनेचीच सत्ता महानगर पालिकेत होती व तुमचेच महापौर व नगरसेवक सत्ता भोगत होते. मग त्यावेळी हा भ्रष्टाचार तुम्हाला दिसला नाही का? जर एवढा मोठा कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असता तर एकही सिमेंटची गोणी रस्तावर पडली नाही, असा याचा अर्थ होतो.

मात्र आज शहरातील रस्त्यांची कामे व दर्जा काय आहे हे नगरकर अनुभवताहेत. अहिल्यानगरची जनता फार सुज्ञ व चाणाक्ष आहेत. त्यांना सर्व राजकीय आरोप समजतात.

### ...ते अनेकदा तोंडघशी पडले : आ. जगताप

अहिल्यानगरला बदनाम करण्यासाठी शहरातील काही ब्लॅकमेलर लोकं त्यांना अशा स्वरुपाची खोटी माहिती देत आपली दुकानदारी चालू ठेवत असतात. अशांच्या ब्लॅकमेलिंग मुळे अहिल्यानगरमध्ये काहींनी आत्महत्याही केल्या आहेत. अशा ब्लॅकमेलरांच्या आरोपांकडे नगरकर कायमच दुर्लक्ष करत असल्याने ते अनेकदा तोंडघशी पडले आहेत, असल्याचे आ. संग्राम जगताप यांनी सांगितले.

जनतेने माझ्यासारख्या कार्यकर्त्याला दोनदा महापौर व तीनदा आमदार होण्याची संधी दिली आहे. त्यामुळे जनता माझ्याबरोबर असल्याने २०१४ ते २०२४ वर्षांमध्ये झालेल्या प्रत्येक निवडणुकीत माझ्या मतांमध्ये व मताधिक्याही मोठी वाढ झाली आहे. त्यांनी किती आरोप केले तरी नगरकरांना सर्व सत्य माहिती असल्याने ते कधीच अशा खोट्या आरोपांना बळी पडले नाहीत. त्यामुळे त्यांच्या अशा खोट्या आरोपांनी मागेही व आत्ताही काहीही फरक पडला नाही.

**– संग्राम जगताप, आमदार**

# डांगे आयुक्त की भ्रष्टाचाऱ्यांचे प्रवक्ते?

## किरण काळे : आमदारांची नार्को टेस्ट करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मनपातील ७७६ रस्त्यांच्या कामात झालेल्या सुमारे ३५० ते ४०० कोटींच्या महाघोटाळ्याच्या बाबतीत आयुक्त यशवंत डांगे यांनी केलेला खुलासा पाहता ते मनपाचे आयुक्त आहेत की भ्रष्टाचाऱ्यांचे प्रवक्ते? तुमच्या हाती आयुक्त म्हणून आम्ही शहर सोपवलय. मात्र तुम्ही भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालण्यामध्ये व्यग्र आहात. आपल्या कार्यालयात काय चाललंय हे जर आयुक्तांना म ाहीत नसेल, तर ठाकरे शिवसेना त्यांचा अभ्यास वर्ग घेण्यासाठी कागदपत्रांसह सज्ज आहे, असा टोला शहर प्रमुख किरण काळे यांनी लावला.

आयुक्तांनी मनपाच्या प्रांगणात असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर यावे. मी त्यांची शिकवणी घेऊन ते ज्या भ्रष्टाचाऱ्यांना वाचवत आहेत ते त्यांना पुराव्यानिशी दाखवून द्यायला तयार आहे, असे



### नगरकरांच्या हक्कांसाठी लढत राहणार : काळे

नगर शहरामध्ये सर्वत्र कचऱ्यांचा खच चौकाचौकात नागरि वस्त्यांमध्ये, बाजारपेठेमध्ये साचला आहे. ऐन पावसाळ्यात नियोजन शून्य कारभारातून बाजारपेठेच्या शहराचा बहुतांशी भाग खोदून ठेवला आहे. नळाला मैला मिश्रित पाणी येत आहे. दोन दिवस, तीन-चार, कधी कधी एक आठवड्याने पाणी येत आहे. मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला आहे. आजपर्यंत एवढी दुरावस्था या शहराची यापूर्वीच्या कोणत्याच आयुक्तांच्या काळात झाली नव्हती. विद्यमान आयुक्तांनी रिमोट कंट्रोलच्या नादात निष्क्रियतेचा विक्रम केला आहे, असे म्हणत काळे यांनी मनपाचे वाभाडे काढले असून ठाकरे शिवसेना नगरकरांच्या हक्कांसाठी आक्रमकपणे लढत राहील, असेही किरण काळे यांनी म्हटले आहे.

जाहीर आवाहन काळे यांनी केले आहे. विकास कामांमधील भ्रष्टाचार दडवण्यासाठी त्यांची हिंदुत्वाच्या नावाने बनवाबनवी सुरू आहे. भगवा टिळा, भगवी टोपी, भगवा पंचा घालून शहराचे लोकप्रतिनिधी भगवद्गीतेत नैतिकतेने वागण्याच्या दिलेल्या उपदेशाच्या विरुद्ध वागत आहेत. हा भगव्याचा, हिंदुत्वाचा अपमान असल्याचा आरोप आ. संग्राम जगताप यांचे

पान ४

## संमिश्र

### बिहारमध्ये १२५ युनिट वीज मोफत मिळणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाटणा** : बिहारमधील नागरिकांना १२५ युनिट वीज मोफत मिळणार आहे. यासोबतच पुढील तीन वर्षांत घरगुती ग्राहकांना सौरऊर्जेचा लाभही मिळेल. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी गुरुवारी वाजता ही घोषणा केली. मुख्यमंत्र्यांनी एक्सवर सांगितले- आम्ही सुरुवातीपासूनच सर्वांना स्वस्त दरात वीज पुरवत आहोत. आता आम्ही निर्णय घेतला आहे की १ ऑगस्ट २०२५ पासून, म्हणजेच जुलै महिन्याच्या बिलातून, राज्यातील सर्व घरगुती ग्राहकांना १२५ युनिटपर्यंतच्या विजेसाठी पैसे द्यावे लागणार नाहीत.




# उद्धव ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट


## दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा; राजकीय वर्तुळात रंगल्या चर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे हे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनामध्ये ही महत्त्वाची बैठक पार पडली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निरोपसमारंभाप्रसंगी जोरदार टोलेबाजी केल्याचं पाहायला मिळालं होतं. फडणवीस यांनी यावेळी विधानभवनात बोलताना उद्धव ठाकरे यांना थेट सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण दिलं. तुम्हाला इकडे स्कोप आहे, तुम्ही येऊ शकता, असं त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान फडणवीसांच्या या ऑफरनंतर काल उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची बैठक पार पडल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलंच उधाण आल्याचं पाहायला मिळाले.

काल उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीला आदित्य ठाकरे देखील



उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांना हिंदीची सक्ती हवीच कशाला हे पुस्तक देखील भेट दिले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार विरोधी पक्ष नेतेपद, त्रिभाषा सूत्र आणि हिंदीसक्ती या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली आहे.

दरम्यान दुसरीकडे आजच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे देखील उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. अंबादास दानवे यांच्या कार्यालयात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष उद्धव ठाकरेंच्या

पान ४

# मंत्रालय, नाशिक, ठाणे हनीट्रॅपचे केंद्र? नाना पटोलेंचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : राज्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना हनीट्रॅपमध्ये अडकवून त्यांच्याकडून खंडणी उकळण्याच्या घटनेमुळे सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ माजली आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी काल, गुरूवारी सलग दुसऱ्यांदा हा विषय हा विषय विधानसभेच्या पटलावर मांडला.

तसेच या प्रकरणी सभागृहाच्या अध्यक्षांनी निर्देश दिल्यानंतरही सरकार स्पष्टीकरण देत नसल्याचा आरोप केला. दरम्यान, राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी पटोले म्हणतात तसे काही घडलेच नसल्याचा दावा करत आपल्या तोंडावर बोट ठेवले

पान ४

# दीपक काटेसह त्याच्या सहकाऱ्याला जामीन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोलापूर** : संभाजी ब्रिगडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला काळे फासल्याप्रकरणी अखेर दीपक काटेसह त्याच्या एका सहकाऱ्याला जामीन मंजूर झाला आहे. संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणी यापूर्वीच दीपक काटेला जशास तसे प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढे काय होते? हे पाहणे रंजक ठरणार आहे.

दीपक काटेने संभाजी ब्रिगेड या संघटनेच्या नावात छत्रपती संभाजी महाराजांचा एकेरी उल्लेख होत असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी गत १३ जुलै रोजी त्याने संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला काळे फासले



होते. या प्रकरणाचे राज्यात तीव्र पडसाद उमटले. सर्वच राजकीय व सामाजिक संघटनांनी त्याचा निषेध केला.

या घटनेनंतर पोलिसांनी दीपक काटेसह ७ जणांवर गुन्हा दाखल केला होता. तसेच दीपक काटे व त्याचा सहकारी भुवनेश्वर शिरगिरे या दोघांच्या मुसक्या आवळल्या होत्या. त्यांना अक्कलकोट न्यायालयात हजर केले असता कोर्टाने या दोघांना २० हजारांचा जातमुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, अक्कलकोट तालुका प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एम. एम. कल्याणकर यांनी हा जामीन मंजूर केला. कोर्टाच्या आदेशांनुसार, दीपक काटे व भुवनेश्वर शिरगिरे या दोघांनाही आठवड्यातून एकदा म्हणजे दर ८ दिवसाला अक्कलकोट किंवा सोलापूर येथील पोलिस ठाण्यात हजेरी लावावी लागणार आहे.

दुसरीकडे, दीपक काटेला ३ जानेवारी रोजी पुणे पोलिसांनी विमानतळावर अटक


पान ४

# शेतकऱ्यांना नुकसानीची सरसकट भरपाई द्या

## आ. विठ्ठलराव लंघे यांची विधानसभेच्या सभापतींकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा मतदारसंघात मे २०२५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसाने शेती पिकांचे प्रंचड नुकसान होवून गोरगरीबांच्या घरांची सोसाट्याच्या वाऱ्याने प्रचंड दाणादाण होवून पडझड झालेली आहे. तर अवकाळी पावसाने नेवासा तालुक्यात कांदा, केळी, सोयाबीन आणि बाजरी या मुख्य पिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. त्यामुळे या नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीचा लाभ सरसकट मिळावा,



अशी मागणी आ. विठ्ठलराव लंघे यांनी काल गुरुवारी विधानसभेच्या सभापतींकडे केली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईची आशा पल्लवित झाली आहे.

आ. लंघे म्हणाले की, माझा नेवासा तालुका हा ग्रामीण स्वरूपाचा भाग असून सुमारे ८० टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. माहे मे आणि जून २०२५ दरम्यान अचानक झालेल्या वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होवून घरांची पडझड झालेली आहे, असा मुद्देसुद प्रश्न सभापतींकडे उपस्थित केल्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा सरकारच्या भूमिकेकडे लागल्या आहेत.

# झगडे फाटा-वडगाव पान रस्त्याची दुरुस्ती करा

## आ. आशुतोष काळे यांनी वेधले सभागृहाचे लक्ष



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघातील अत्यंत महत्वाचा व मोठ्या प्रमाणात सर्व प्रकारच्या वाहनांची नेहमीच वर्दळ असणाऱ्या राज्यमार्ग ६५ अर्थात झगडे फाटा ते वडगाव पान रस्त्याच्या दुरुतीचा प्रश्न आ. आशुतोष काळे यांनी विधिमंडळ अधिवेशनात उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधत लवकरात लवकर या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे.

आ. काळे म्हणाले की, राज्यमार्ग ६५ वरील झगडे फाटा-वडगाव पान फाटा रस्ता कोपरगाव मतदार संघातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावर बाराही महिने मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा असते. यामध्ये जड वाहतुकीचा देखील मोठ्या प्रमाणात समावेश असतो.

कोपरगाव मतदारसंघाच्या लगतच जगप्रसिद्ध शिर्डीचे श्री साईबाबा देवस्थान असून या ठिकाणी वर्षभर धार्मिक कार्यक्रम व उत्सव सुरु असतात. त्या उत्सवावेळी शिर्डी संस्थानच्या सुरक्षेच्या दृष्टीने व देश

पान ४

### नागरिकांकडून आ. काळेंच्या भूमिकेचे कौतुक

झगडे फाटा-वडगाव पान फाटा रस्ता अर्थात राज्यमार्ग ६५ हा पोहेगाव गटातील व कोपरगाव-संगमनेर-राहाता तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या कोपरगाव मतदार संघातील नागरीकांसाठी अत्यंत महत्वाचा असणारा मार्ग आहे. परंतु, या रस्त्यावर प्रमाणापेक्षा जास्त वाहनांची वर्दळ असल्यामुळे हा रस्ता दुरुस्त करूनही पुन्हा अनेक ठिकाणी अतिशय खराब झाला आहे. या रस्त्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी आ. काळे यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे झगडे फाटा-वडगाव पान फाटा रस्ता (राज्य मार्ग ६५) ची दर्जोन्नती करुन हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबत त्यांचा पाठपुरावा सुरु आहे. यावरच न थांबता या रस्त्याचा प्रश्न विधिमंडळ अधिवेशनात उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधून या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत घेतलेल्या भूमिकेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील कामे पूर्ण करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामाचा आढावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : आगामी काळात होणाऱ्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या दृष्टीने शिर्डी विमानतळ हे महत्त्वाचे विम ानतळ असणार आहे. त्यामुळे हे विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी नुतनीकरण व विस्तारीकरणाची कामे तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल येथे दिले.




शिर्डी व पुरंदर विमान तळाच्या कामाचा आढावा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील विधानभवनातील बैठकीत घेण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया,

पान ४

### ... आणखी जमिन संपादीत करावी

शिर्डी विमानतळ हे मुंबई व नवी मुंबई विमानतळाच्या जवळचे विमानतळ आहे. येथील लहान विमाने पार्किंगसाठी शिर्डी विमानतळाचा वापर होऊ शकतो. त्यादृष्टीने आतापासूनच शिर्डी विमानतळावर सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असल्यास आणखी जमिन संपादीत करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

# विधानभवनाबाहेरच नेत्यांचा राडा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई** : दोन्ही नेत्यांनी एकमेकांना शिवीगाळ केल्याची चर्चा विधानभवन परिसरात होत आहे. काही दिवसांपूर्वीच जितेंद्र आव्हाड यांनी विधानभवनात जात असताना रेड कार्पेटरवरच नाव न घेता घोषणाबाजी करत गोपीचंद पडळकरांना डिवचलं होतं. आता, या घटनेचे पडसाद पाहायला मिळत आहेत. अशातच काल जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांजवळच दोघांचे कार्यकर्ते भिडल्याचे पाहायला मिळाले.

पहिल्यांदा पडळकरांच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचे जितेंद्र आव्हाड म्हणाले. आम्हाला याच्यापेक्षा जास्त पुरावा देण्याची गरज नसल्याचे आव्हाड म्हणाले. जर तुम्ही विधानसभेत गुंडाना प्रवेश देणार असाल तर असे म्हणत आव्हाड यांनी सरकारवर टीका देखील केली.

# प्रियकराने केला प्रियेसीवर चाकूने वार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : किरकोळ भांडणाच्या कारणावरून प्रियकराने आपल्या साथीदार प्रियेसीच्या गळ्यावर चाकूने वार करून तीला ठार मारण्याचा प्रयत्न केला. दि. १६ जुलै रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास नवनागापूर येथील आनंदनगर भागात प्रेमसंबंधातून हा प्रकार घडला आहे.



यासंदर्भात रंजना परशु रोकडे (वय ४० रा. काटवन खंडोबा, अहिल्यानगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांची मुलगी प्रतिक्षा परशु रोकडे ही आकाश रघुनाथ शेरकर (रा. सप्रे मळा, सह्याद्री चौक, एमआयडीसी) याच्या सोबत गेल्या सात महिन्यांपासून आनंदनगर, नवनागापूर येथे भाड्याच्या घरात राहत आहे. हे दोघे प्रेमसंबंधात असून लवकरच विवाह करण्याचे ठरवत होते. मात्र, घरगुती कारणांवरून दोघांमध्ये वारंवार वाद होत होते.

प्रतिक्षा ही सकाळी ११ वाजता आपल्या आईला फोन करून म्हणाली की, आकाशसोबत किरकोळ वाद झाला आणि त्याने रागाच्या भरात चाकूने तिच्या गळ्यावर वार करून तो घरातून निघून गेला आहे. दरम्यान, या घटनेनंतर प्रतिक्षाला एमआयडीसी पोलिसांनी तत्काळ उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल केले असून ती सध्या आयसीयूमध्ये उपचार घेत आहे. प्रतिक्षाने उपचारादरम्यान आईसमोर दिलेल्या माहितीनुसार, केवळ भांडी न घासल्याच्या कारणावरून आकाशने तिच्यावर चाकूने हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले. पोलिसांनी आकाश शेरकर विरोधात खूनाचा प्रयत्न कलमान्वये गुन्हा दाखल केला असून त्याला ताब्यात घेतले आहे.

# शिक्षक बदलीतील प्रमाणपत्रांची चौकशी करा

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीची मागणी; अन्यथा उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक बदली प्रक्रियेत दिलेले दिव्यांग, घटस्फोटीत, परित्यक्ता, मतिमंद व गंभीर आजार प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणी जिल्हा रुग्णालय व त्या संबधित विभागांना न देता, शिक्षक बदलीतील प्रमाणपत्रांची चौकशी करण्यासाठी त्रयस्थ समितीची नेमणूक नाशिक जिल्हा रुग्णालय येथून करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे



निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले असून, याबाबत तातडीने कारवाई न झाल्यास जिल्हा परिषद समोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षक बदली प्रक्रियेमध्ये प्राथमिक शिक्षकांनी स्वतःच्या हितासाठी सन २०२१ मध्ये बनावट कर्णबधिर, मतिमंद बनावट प्रमाणपत्र दिलेले असून, हे प्रमाणपत्र देणारे जिल्हा रुग्णालय मध्ये रॅकेट होते. जिल्हा परिषदेने त्याच जिल्हा रुग्णालयाकडे तपासणी देऊ नये, ते प्रमाणपत्र तपासणीसाठी त्रयस्थ समिति नेमून नाशिक जिल्हा रुग्णालय किंवा आर्मी रुग्णालय पुणे यांच्याकडून तपासणी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यापूर्वी सन २०२२ मध्ये बदली प्रक्रियेत प्रमाणपत्राची तपासणी ससून रुग्णालय पुणे यांच्याकडून करण्यात येणार होती. त्याबाबत शिक्षकांनी स्वतःच्या बचावासाठी कोर्टात धाव घेतली. त्यानंतर त्या प्रमाणपत्र तपासणी अहवाल प्रलंबित आहे. काही महिला शिक्षकांनी घटस्फोटीत व परितक्त्या असल्याचे दाखवून शिक्षण विभागाची दिशाभूल केली आहे.

### शासन परिपत्रकास वर्गची पायमल्ली?

जिल्ह्यातील सर्व शिक्षक बदली प्रक्रियेमध्ये ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई १५ जून २०२५ चे शासन परिपत्रक स वर्गची पायमल्ली मोठ्या प्रमाणात केली गेली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक बदली प्रक्रियेत दिलेले दिव्यांग, घटस्फोटीत, परित्यक्ता, मतिमंद व गंभीर आजार प्रमाणपत्र कागदपत्रे तपासणी जिल्हा रुग्णालय व त्या संबधित विभागांना न देता, त्रयस्थ समितीची नेमणूक नाशिक जिल्हा रुग्णालय येथून करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच पुन्हा निष्पाप बळी?

## शहरात जड वाहतूकीला वरदहस्त कुणाचा; समाजवादी पार्टीकडून प्रशासनाचा निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर शहरातील वाहतूक समस्या आजपर्यंत सुटलीच नाही. पूर्वी उड्डाणपूल व बाह्य वळण रस्ता नसल्यामुळे दररोज अपघात होत होते. त्यात कित्येक बळी गेले. परंतु, आता शहरात उड्डाणपूल तसेच बाह्य वळण रस्ता असूनही बिनधास्तपणे जड वाहतूक सुरु आहेत व निष्पाप नागरिकांचे बळी जात आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पुन्हा एका तरुणाचा निष्पाप बळी गेला असून नगर शहरातील जड वाहतूकीला कोणीचा वरदहस्त आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



आठ दिवसापूर्वीच तारकपूर येथे एका महिलेचा दुर्दैवी अंत झाला. परंतु बेजबाबदार अधिकाऱ्यांनी याची कोणतीच दखल घेतली नाही. काल दिल्लीगेट येथे पुन्हा प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे एक निष्पाप तरुणाचे दुर्दैवी अंत झाले. याला अहमदनगर पोलीस अधीक्षक, ट्रॅफिक पोलीस व महापालिकेचे अधिकारीच जबाबदार असून त्या सर्वांचे समाजवादी पार्टीने निषेध केला आहेत. तसेच बळी गेलेल्या कुटुंबियांना २५ लाख रुपये नुकसान भरपाई म्हणून द्यावी. प्रशासन अजून किती बळीची वाट ना पाहत आहे. त्यामुळे त्वरित शहरातून जड वाहतूकीला बंदी घालावी. अन्यथा नगरकरांच्या सुरक्षतेसाठी समाजवादी पार्टी मोठे जन आंदोलन उभारेल, याची प्रशासनाने नोंद घ्यावी.यावेळी समाजवादी पार्टीचे आबिद हुसैन यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

# 'जलतरण'च्या निवड चाचणीत ८० खेळाडूंचा समावेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्य जलतरण स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघाची निवड चाचणीसाठी जिल्ह्यातील ८० खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुल येथे १९ ते २१ जुलै दरम्यान होणाऱ्या ज्युनिअर गटाच्या राज्य जलतरण स्पर्धेत सदर खेळाडू उतरणार आहे.

लोणी येथे नुकतेच झालेल्या स्पर्धेतून जिल्हा संघाची निवड संघटनेचे सचिव रावसाहेब बाबर यांनी जाहीर केली आहे. या संघासाठी मार्गदर्शक म्हणून सर्वेश देशमुख, व्यवस्थापक म्हणून अकिल शेख व योगिता तनपुरे हे काम पाहणार आहेत. तर राष्ट्रीय खेळाडू अमरितसिंग राजपूत हा संघाचे नेतृत्व करणार आहे.

# शहीद जवान घोडेकर यांचे स्मारक व्हावे

## संगमनेर शहर काँग्रेसची मागणी; नगरपालिकेला दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील मेजर संदीप घोडेकर यांचे देशसेवा बजावत असताना हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मेजर संदीप घोडेकर यांनी देशासाठी दिलेले बलिदान याचा विचार करून त्यांचे संगमनेर तालुक्यात स्मारक व्हावे अशी मागणी संगमनेर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.

संगमनेर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना याबाबतचे निवेदन देण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, विश्वासराव मुर्तडक, राजेंद्र वाकचौरे, गणेश मादास, नितीन



अभंग, जावेद खान पठाण, मुजिक खान, वसीम शेख, आवेद खान, डॉ. विजय पवार, शेहेबाजअली शेख, अलोक बर्डे, बादल जेधे, ललित शिंदे, शरद पावबाके, एकनाथ श्रीपत, सुभाष दिघे, संजय कानवडे यांसह आदी उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील मेजर संदीप घोडेकर हे दिल्ली येथे भारतीय सैन्य दलात कर्तव्य बजावत असताना त्यांना वीरमरण आले. त्यांची देशाप्रती असलेली निष्ठा व कर्तव्यपरायनता भविष्यात संगमनेर शहरातील नागरिकांना कायम देशसेवेसाठी प्रेरणा व स्फूर्तीदायी असणार आहे. त्यासाठी त्यांचे संगमनेर येथे स्मारक होणे गरजेचे आहे. तसेच संगमनेर येथील अकोला नाका चौकाला शहीद मेजर संदीप घोडेकर यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.


# विद्या गाडेकर यांना अटकपूर्व जामीन मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शेवगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या विद्या गाडेकर यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे.

विद्या गाडेकर पत्रकार परिषदेमध्ये म्हटले आहे की, माझ्यावर राजकीय दृवेषातून ४२० चा व आणखी एक असे दोन खोटे गुन्हे दाखल करण्यात आले व माझी राजकीय कारकीर्द संपवण्याच्या हेतूने व समाजात बदनामी करण्याच्या उद्देशाने शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी काही राजकीय विरोधक यांच्या सांगण्यानुसार त्यांच्याशी सगंमत करून कोणताही संबंध नसताना देखील ४२० चा गुन्हा दाखल करून घेतला.

गाडेकर यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटामध्ये प्रदेश सचिव महाराष्ट्र राज्य हे पद भूषवले असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शेवगाव पाथर्डी विधानसभा निवडणूक निरीक्षक २०२४ चे काम केलेले आहे. तसेच पक्षनिरीक्षक ओबीसी या पदावर सुद्धा कार्यरत होते. मध्यंतरीच्या काळात शिवसेना पक्ष शिंदे गटात प्रवेश करून पदाधिकारी



म्हणून समाजामध्ये काम करत होते.

मात्र पोलीस निरीक्षक शेवगाव यांना हाताशी धरून सगममत करून राजकीय दबावाखाली येऊन कोणत्याही घटनेची चौकशी न करता व विचारपूस न करता दोन खोटे गुन्हे दाखल केले आहे या सर्व गुन्ह्याची पुरावे न्यायालयात सादर केल्याने न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. व शेवगाव पोलिसांनी आम्हाला आमची बाजू मांडण्याची संधी न देता राजकीय दबावाखाली आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केलेले आहेत आमची समाजामध्ये बदनामी केलेली आहे. सदर बदनामीस पोलीस प्रशासन संपूर्णपणे जबाबदार आहे सदर बदनामीमुळे व खोटे गुन्हे दाखल झाल्याने शारीरिक व मानसिक स्थिती खालावलेली आहे त्यामुळे माझ्या वरील प्रमाणे खोटे गुन्हे दाखल झाले असल्याने त्याची चौकशी करून मला त्या गुन्ह्यातून वगळण्यात यावे व संबंधित पोलीस प्रशासन यांच्यावर त्वरित कारवाई करुन राजकीय वरदहस्त असलेला तो व्यक्ती शोधून त्याच्यावर देखील कारवाई करण्यात यावी अन्यथा येत्या आठ दिवसात कारवाई न झाल्यास पोलीस महासंचालक नाशिक यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला.

आम्हाला आमची बाजू न मांडून देता राजकीय दवाखाली आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केलेले आहे व यामध्ये पोलीस प्रशासन संपूर्णपणे जबाबदार असून ज्या व्यक्तींनी पोलीस प्रशासनावर आपल्या राजकीय दबावाचा बोजा टाकलेला आहे त्या व्यक्तींवर देखील कारवाई करण्याची मागणी करून मी महिला असल्याने हा माझा छळ सुरू आहे. परंतु मी अहिल्याबाई होळकरांच्या जिल्ह्यातील असून विरोधकांना कामातून उत्तर द्यायला समर्थ आहे असल्याचे सांगितले.
सामाजिक कार्यकर्त्या विद्या भाऊसाहेब गाडेकर.

# कर्जत रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी राऊत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत राऊत यांची निवड झाली आहे.

रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीच्या नूतन पदाधिकारी व संचालक मंडळाचा पदग्रहण समारंभ लकी हॉटेल येथे उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर ईश्वर बोरा कार्यक्रमाचे अध्यक्ष व पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रसन्ना खाजगीवाले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षांची निवड रोटेरियन राजकुमार चौरे यांनी केली व त्याला रोटेरियन रवींद्र जगदाळे यांनी अनुमोदन दिले.

माजी अध्यक्ष रोटेरियन राजेंद्र जगताप यांच्याकडून नूतन अध्यक्ष रोटेरियन चंद्रकांत राऊत यांनी तर माजी सचिव काकासाहेब काकडे यांच्याकडून नूतन सचिव रोटेरियन शाहाबाज आतार यांनी पदभार स्वीकारला.

माजी अध्यक्ष रोटेरियन राजेंद्र जगताप यांनी गेल्या वर्षभरात रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीने राबविलेल्या अनेक उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी डॉ. संदीप काळदाते, राजेंद्र जगताप, राजेंद्र सुपेकर, नितीन तोरडमल, विशाल मेहेत्रे, संतोष सुरवसे, नारायण तनपुरे, दयानंद पाटील, उपमन्यु शिंदे, राहुल खराडे, नितीन देशमुख, संदीप गदादे, गणेश जेवरे, निलेश दिवटे, रवींद्र राऊत, ओंकार तोटे, प्रशांत फलके, सचिन धांडे, डॉ. चेतन निंबाळकर, प्रसाद ढोकरीकर यासह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी राऊत हिने केले. तर आभार शाहाबाज आतार यांनी मानले.

आगामी काळात सामाजिक शांतता, शिक्षण, पर्यावरण, आरोग्य या क्षेत्रामध्ये विविध उपक्रम राबविले जातील. रोटरी इंटरनॅशनलने निश्चित केलेल्या सातही क्षेत्रात रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटी चांगले काम करेल.

– चंद्रकांत राऊत

# जनसुरक्षा कायद्याला राज्यपालांनी मंजुरी देवू नये

## जनसुरक्षा विधेयकविरोधी संघर्ष समितीची मागणी; राजभवन येथे राज्यपालांची घेतली भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्य सरकारच्या जनसुरक्षा विधेयक (बिल क्रमांक ३३, २०२४) ला मंजुरी देऊ नये, अशी मागणी जनसुरक्षा विधेयकविरोधी संघर्ष समितीने दि.१६ जुलै रोजी राज्यपालांकडे केली. विविध राजकीय पक्ष व लोकचळवळींच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत राजभवन येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना निवेदन सादर करण्यात आले.



यावेळी कायद्यातील विविध मुद्द्यांवर व जाचक तरतुदी बद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. या संघर्ष समितीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी-लेनिनवादी) लिबरेशन, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, भारत जोडो अभियान, श्रमिक मुक्ती दल यांच्यासह डावे प्रागतिक पक्ष व संघटनांचा समावेश आहे. सर्व पक्ष व संघटना संविधानाच्या चौकटीत राहून काम करत असून या विधेयकामुळे लोकांच्या मूलभूत हक्कांवर गदा येणार असल्याचा इशारा या पक्ष-संघटनेच्या नेत्यांनी दिला आहे.

यावर राज्यपाल यांनी समितीचे आणखी काही मुद्दे लेखी स्वरूपात स्पष्ट करण्याची सुचना अधिकाऱ्यांना दिल्या व दिलेले निवेदन काळजीपूर्वक वाचून योग्य वाटतील त्या मुद्यांवर राज्य शासनाकडे स्पष्टीकरण मागितले जाईल, असे त्यांनी समितीच्या शिष्टमंडळाला सांगितले आहे. याप्रसंगी कॉ. ड. सुभाष लांडे, कॉ. प्रकाश रेड्डी, आमदार कॉ. विनोद निकोले, उल्का महाजन, कॉ. उदय भट, ड. राजेंद्र कोर्डे, ब्रायन लोबो, कॉ. अशोक सुर्यवंशी, कॉ. चेतन माढा, कॉ. कुशल राउत उपस्थित होते.

# ..त्यावेळी ब्रिगेडियर उस्मान भारतीय सैन्याकडून लढले

## डॉ.शमा फारुकी; शहिद ब्रिगेडियर उस्मान जयंतीनिमित्त शाळेत वह्या वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ब्रिगेडियर मुहम्मद उस्मान हे भारत-पाकिस्तान युद्धात शहीद झालेले भारतीय लष्कराचे अधिकारी होते. भारताच्या फाळणीच्या वेळी त्यांनी इतर अनेक मुस्लिम अधिकाऱ्यांसह पाकिस्तानी सैन्यात सामील होण्यास नकार दिला आणि भारतीय सैन्यात सेवा करत राहिले. ३ जुलै १९४८ रोजी जम्मू आणि काश्मीरमध्ये पाकिस्तानी सैन्याशी लढताना ते शहीद झाले. त्यानंतर त्यांना शत्रूचा सामना करताना दाखवलेल्या शौर्यासाठी भारताचे दुसरे सर्वो



च्च लष्करी पदक महावीर चक्रने सन्मानित करण्यात आले, असे प्रतिपादन मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या उपाध्यक्षा डॉ. शमा फारुकी यांनी केले.

शहिद ब्रिगेडियर मोहम्मद उस्मान यांच्या जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीतर्फे आलमगीर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये मोफत वह्या वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. कमर सुरुर, डॉ. शमा फारुकी, राजुभाई शेख, अकीला बाजी, मुख्तार शेख, शेख जाकेरा, शेख नसरीन बानो, शेख शगूफता, सय्यद शाजिया, सय्यद रफअत, शेख शिरीन आदी उपस्थित होते.

यावेळी विधार्थायांनी विविध बालगीते सादर केली. विद्यार्थ्यांना वह्यासाठी वसंत पारधे, श्रीकांत सोनटक्के, डॉ. दमन काशीद, हेमंत नरसाळे, चारुता शिवकुमार, विका कांबळे, संजय भिंगारदिवे, अभय कांकरिया,राजुभाई शेख, डॉ. परवेज अशरफी,एड. गुलशन धाराणी आदिंनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. तर आभार राजुभाई शेख यांनी मानले.

# सरपंचांनो, ॲप्लिकेशन डाऊनलोड करून घ्या

## जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत गावे हागणदारी मुक्त ठेवून त्यांना अधिक आदर्श आणि टिकाऊ बनविण्याचा केंद्र व राज्य शासनाचा प्रयत्न सुरू आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामपातळीवरील जनसहभाग वाढवण्यासाठी सरपंच संवाद हे नाविन्यपूर्ण मोबाईल ॲप्लिकेशन सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करावे, असे




आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक आनंद भंडारी यांनी केले आहे.

सरपंच संवाद हे ॲप्लिकेशन केंद्र शासनाच्या वतीने क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या सहकार्याने विकसित करण्यात आले आहे. या गावातील स्वच्छता व ग्रामविकासाचे उपक्रम पोस्ट स्वरूपात शेअर करू शकतात. तसेच इतर गावांतील उत्तम कामांची उदाहरणे पाहता येतात. पव्दारे सरपंच यांना विषयानुसार संवाद साधता येतो. पाणी व स्वच्छता विषयक बातम्या व यशोगाथा मिळता येतात. तसेच प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्रही प्राप्त करता येते. हा उपक्रम सरपंचांना प्रेरणा देणारा संवादाचे नवे व्यासपीठ असून, ग्रामपातळीवरील सर्वांगीण, शाश्वत आणि लोकसहभागातून होणाऱ्या विकासासाठी उपयुक्त ठरत आहे.

### ॲप्लिकेशनचा प्रभावीपणे वापर करावा

जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी सदरचे मोबाईल ॲप्लिकेशन डाऊनलोड करून त्याचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन व जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले यांनी केले आहे.

# मावा तयार करणारा कारखाना उध्द्वस्त

## दोन लाख रुपयांचा मुद्देमाल केला हस्तगत; विशेष पोलिस पथकाची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरात कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेला सुगंधी तंबाखू, मावा तयार करणारा कारखाना जिल्हा पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाने उध्दवस्त केला. या ठिकाणाहून सुमारे २,०८,५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन ४ आरोपींना अटक केलेली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुगंधी तंबाखू, मावा तयार करणारा कारखाना सुरू असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधिकारी सोमनाथ घार्गे यांना मिळाली होती. या प्राप्त माहितीनुसार त्यांनी आपल्या पथकाला कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

### पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल

शाम पांडुरंग मोकाटे, कैलास बबनराव मोकाटे, सुभाष गुलाबराव डागवाले, राहुल सुधीर पारधे असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून २४ हजार रुपये किंमतीची ३६ किलो सुगंधीत तंबाखू, १९ किलो तयार मावा, मावा तयार करण्याची २ मशीन असा एकूण २,०८,५०० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी विशेष पथक तयार करुन अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष आ. खाडे हे शहरात कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीमध्ये विशेष पोलीस पथकासह पेट्रोलींग करुन अवैध धंद्यांची माहिती घेत असताना त्यांना कैलास बबनराव मोकाटे (रा. महात्मा फुले रोड, माळीवाडा), व सुभाष गुलाबराव डागवाले हे विश्वास डांगे यांचे पत्र्याचे शेडमध्ये (डांगे मळा, काटवण खंडोबा रोड, अहिल्यानगर) तंबाखूजन्य पदार्थांचे विक्री व तयार करीत असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी या ठिकाणी छापा घातला असता वरील आरोपी हे सुगंधीत तंबाखू, सुगंधीत तंबाखू पासून मावा बनविण्यासाठी सुपारी, चुना पावडर, तयार मावा तयार करीत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी पाहताच आरोपींनी या ठिकाणाहून पळ काढण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांनी त्यांना पकडले.

# आत्मा मालिकचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आत्मा मालिक इंग्लिश मीडियम गुरुकुल व ज्युनिअर कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम ठेवत गुणवत्ता यादीत आपली नावे कोरले आहेत.



इयत्ता ५ वीतून धैर्य प्रवीण अवताडे याने २३२ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. तसेच इयत्ता ८ वीतून साईश नितीन अनाप व महेश गोरख जाधव यांनी प्रत्येकी २२४ गुण मिळवले आहेत. श्रावणी ज्ञानेश्वर तासकर हिने २१० गुण, समर्थ प्रमोद जाधव याने २०८ गुण, गार्गी सुजीत भास्कर हिने १९८ गुण तर आदिवासी विकास विभाग अंतर्गत नामांकित योजनेतून प्रवेशित झालेली अंकिता सोमनाथ पोतिंदे हिने १९२ गुण मिळवून आपले नाव गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांमध्ये कोरले आहे.

या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य माणिक जाधव म्हणाले, "विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे, शाळेच्या वेळेव्यतिरिक्त विशेष तास घेणे व परीक्षेचा सातत्यपूर्ण सराव घेणे या शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले आहे."

या यशस्वी कामगिरीसाठी प्राचार्य माणिक जाधव, मीनाक्षी काकडे, नितीन सोनवणे, विभाग प्रमुख दिनेश शिरसागर, दर्शना ठाकूर, भाऊसाहेब जावळे, भारती ताठे तसेच भुजाडे चित्रा, मन्सूरी रुक्सार, तांबे सारिका, शिंदे दिपा, वाणी योगेश, औताडे अपर्णा, आरती मुळीक, आहेर निकिता, चव्हाण अंजली, पाटील आरती, उदावंत राणी, गुढघे कोमल, वाजे नारायण, बारहाते कावेरी, सोफिया शेख सय्यद, गाढवे किरण यांचे विशेष योगदान राहिले आहे.

# अहिल्यानगरमध्ये विवाहितेंचा छळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दोन विवाहित महिलांनी सासरी होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळाविरोधात दोन स्वतंत्र फिर्यादी तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल केल्या असून दोन्ही प्रकरणांत पोलिसांनी गुन्हे नोंदवले आहेत. सासरच्या मंडळींकडून होणारी मारहाण, शिवीगाळी, पैशासाठी दबाव व उपाशी ठेवून त्रास देण्याचे आरोप या महिलांनी आपल्या फिर्यादीत केले आहेत.



ठाकूरगल्ली, तोफखाना येथे राहत असलेल्या विवाहितेने आपल्या पतीसह सासरच्या पाच जणांविरूध्द फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, स्वयंपाक व घरकामाच्या कारणांवरून सतत भांडण, शिवीगाळ करत छळ सुरू होता. तसेच, दोन मुली झाल्यानंतर तुला फक्त मुलीच का होतात? या कारणावरून मानसिक त्रास देण्यात आला. पती प्रसाद रमेश लिमये, सासु वैशाली रमेश लिमये, सासरे रमेश श्रीपद लिमये, दीर राहुल रमेश लिमये, जाव शितल राहुल लिमये (सर्व रा. पत्रकार चौक, सावेडी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी घटना सिव्हिल हाडको, मेगानंद चौक येथे राहणाऱ्या विवाहितेने आपल्या पतीसह आठ नातेवाईकांविरूध्द फिर्याद दाखल केली आहे. फर्यादीच्या वडिलांनी शेती विकल्याचे समजल्यावर पती व इतर सासरच्या लोकांनी तिला पाच लाख रूपये आणण्याचा दबाव टाकला. भरोसा सेलमध्ये सासरचे कोणीही समेटासाठी हजर राहिले नाही. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती मंगेश साहेबराव साळवे, ननंद संध्या सुशिल गायकवाड, सुशिल मधुकर गायकवाड, सासु शारदा साहेबराव साळवे (सर्व रा. श्रीरामपूर), ननंद संगीता आनंद मोरे, आनंद सुडकाजी मोरे, ननंद रेखा राजेश गायकवाड व भाची (सर्व रा. नाशिक) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# काँग्रेसच्या लढ्यास आले मोठे यश

## शिंगणापूर घोटाळा प्रकरणी चौकशी सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : शिंगणापूर देवस्थानमधे बनावट अ‍ॅप माध्यमातून झालेल्या करोडो रुपयाच्या घोटाळ्या विरोधात आंदोलनाच्या माध्यमातून काँग्रेसने सुरु केलेल्या लढ्यास अखेर यश मिळाले. सायबर विभागाने फिर्याद दाखल करत चौकशीला सुरुवात केली.

सविस्तर वृत्त असे की, शनिशिंगणापूर देवस्थानमध्ये बनावट अ‍ॅप, बनावट कोड, बनावट पावती पुस्तक या माध्यमातूम झालेल्या करोडो रुपयाच्याच्या घोटाळ्या विरोधात काँग्रेसने प्रथम आवाज उठवीत यास वाचा फोडली, इतकेच नव्हे तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सभाजी माळवदे याच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून लढा दिला.




अखेरीस देवस्थान मधील बनावट अ‍ॅप घोटाळ्याविषयीचा प्रश्न विधानसभेमध्ये उपस्थित झाला. यावर राज्याचे मुख्यमंत्री व विधी व न्यायमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. बनावट अ‍ॅप प्रकरणातील दोषीवर फौजदारी कारवाई, विश्वस्त व कर्मचाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याचे आदेश दिले.

या घोटाळ्या विरोधात काँग्रेससह, भाजपा, शेतकरी संघटना, बसपा, छावा संघटना, या संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील शनिभक्त देखील आंदोलनात उतरून सहभागी झाले. त्यांच्यामुळे हा लढा इथपर्यंत आला त्या सर्वांचे अभिनंदन.

# मनपा आरोग्य अधिकाऱ्यांना धक्काबुक्की

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांना माजी नगरसेवकाकडून धक्काबुक्की आणि शिवीगाळ करण्यात आली. याच्या निषेधार्थ उद्या मनपा कर्मचारी युनियनच्या वतीने मनपा प्रभाग कार्यालय बंद ठेवण्यात येणार असून सकाळी साडे १० वाजता मुख्य प्रशासकीय इमारत येथे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुद्गल, सचिव आनंद वायकर यांनी केले, तसेच या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. याप्रकरणी कामगारांमधून संताप व्यक्त होत आहे.

# नगरपरिषदेची अतिक्रमणविरोधी मोहीम सुरू

## सोमवारपासून कारवाई अधिक तीव्र होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी शहरात सार्वजनिक रस्ते, नाले, तसेच फूटपाथवरील अनधिकृत टपऱ्या व हातगाड्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या अडथळ्याच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून गुरुवारपासून अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ही कारवाई सोमवारपासून अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी दिली.



शहरात राबवण्यात येणारी अतिक्रमण विरोधी मोहीम टप्प्याटप्प्याने राबवली जाणार असून, सुरुवातीला नागरिकांना व व्यापाऱ्यांना सूचना देऊन स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण काढण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, नंतर पाथर्डी नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून संयुक्त विद्यमाने प्रत्यक्ष कारवाई करण्यात येणार आहे. मुख्याधिकारी लांडगे म्हणाले, शहराच्या स्वच्छता, सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने अतिक्रमण ही गंभीर अडचण निर्माण करत आहे. सर्व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने अतिक्रमण हटवावे नागरिकांच्या सुविधेसाठी अतिक्रमण काढले जात आहे.

### काही दिवसांची मुदत देणार

दरम्यान, काही व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी नगरपरिषदेच्या प्रशासनाकडे अतिक्रमण हटवण्यासाठी काही दिवसांची मुदत देण्याची विनंती केली आहे. त्यास अनुसरून येत्या सोमवारपासून प्रत्यक्ष कारवाई करण्यात येणार आहे.

# जिल्हास्तरीय महारक्तदान शिबिराचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय महारक्तदान शिबिराचे आयोजन २० जुलै रोजी सकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.

हे शिबिर ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन सेक्रेटरी कै. भावेशभाई सोलंकी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे चौथे वर्ष असून, याला संग्राम जगताप सोशल फाउंडेशन, नगर आणि ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशन यांचे सहकार्य लाभले आहे. जिल्ह्यातील १० प्रमुख रक्तपेढ्यांची पथके पूर्ण तयारीसह संकलनासाठी सज्ज आहेत.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले, रक्तदान ही काळाची गरज आहे. एक पिशवी रक्त एखाद्या रुग्णासाठी आयुष्य देऊ शकते. यंदा फक्त अहिल्यानगरपुरते मर्यादित न राहता, तालुका पातळीवरही तब्बल १२ तालुक्यांमध्ये महारक्तदान शिबिरांचे आयोजन च्या माध्यमातून करण्यात आले आहे, ही खरोखरच गौरवाची बाब आहे.नरेंद्र फिरोदिया यांनीही यावेळी आपले मत व्यक्त केले.

# दिव्यांगांना कृत्रिम अवयवांचे मोफत वाटप

## नेवासा फाटा ग्रामीण रुग्णालयात शिबीर संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : दिव्यांग बांधवांचे जीवन अधिक स्वावलंबी व सुसज्ज करण्याच्या उद्देशाने नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात भव्य कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी रत्नमाला विठ्ठलराव लंघे या होत्या.



या उपक्रमाचे आयोजन पदमश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय व जिल्हा परिषद, अहमदनगर तसेच जिल्हा रुग्णालय भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को), कानपूर, व एस. आर. ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आलेला होता.

नेवासा तालुक्यातील विविध गावांतील अस्थिव्यंग लाभार्थ्यांना कृत्रिम हात, पाय व कॅलिपर्स यांचे मोजमाप घेऊन तात्काळ मोफत वितरण करण्यात आले. सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला.

### व्यासपीठावर यांची उपस्थिती

व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य तेजश्रीताई लंघे, प्रताप चिंधे, मार्केट कमिटी संचालक शंकरराव लोखंडे, युवा नेते ऋषिकेश शेटे, मनोज पारखे, भाजपा महिला आघाडीच्या अमृताताई नळकांडे, मनीषा वाघ, भारतीताई बेंद्रे, शिवसेना महिला आघाडीच्या शोभा आलवणे, भारती कर्डक, वैद्यकीय अधीक्षक डॉ.काटे, आरोग्य अधिकारी डॉ. दीपक डिंबर, डॉ. मोहसिन बागवान, डॉ. अविनाश काळे, हरिभाऊ जगताप, बाळासाहेब पिसाळ, सतीश शिरसागर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील अतिक्रमणे काढावेत

## मंगरूळ खुर्द येथील ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : तालुक्यातील मौजे मंगरूळ खुर्द ते चव्हाणवस्ती रस्त्यावर दोन्ही बाजूकडील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी अतिक्रमणे केली असल्याने शेतकऱ्यांना व चव्हाणवस्तीवरील ग्रामस्थांना ये- जा करण्यास अडचण निर्माण होत आहे. तरी सदरचे अतिक्रमण हटवून रस्ता खुला करून मिळावा, अशा आशयाचे निवेदन जनशक्ती विकास आघाडीचे महासचिव जगन्नाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली मंगरूळ खुर्द येथील ग्रामस्थांनी शेवगावचे तहसीलदार ए. आर. दहादडे यांना शेवगाव येथे दिले.



निवेदनात पुढे म्हंटले आहे की, तालुक्यातील मौजे मंगरूळ खुर्द ते चव्हाणवस्ती हा सुमारे दिड कि. मी. अंतराचा रस्ता जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात आलेला आहे. येथील चव्हाणवस्तीवर सुमारे २० ते ३० कुटुंब वास्तव्यास आहेत. तसेच मंगरूळ खुर्द गावातील बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनी याच रस्त्यालगत आहेत. त्यामुळे चव्हाण वस्तीचा व शेतकऱ्यांचा दळणवळणासाठी हाच एकमेव रस्ता आहे. परंतु गावातून निघाल्यापासून रस्त्याचे दोन्ही बाजूने मोठे अतिक्रमण झालेले आहे.

निवेदन देतेवेळी भागवत चव्हाण, जानकीराम चव्हाण, कुंडलिक काकडे, मच्छिंद्र काकडे, चांगदेव काकडे, संतोष काकडे, भाऊसाहेब काकडे, पांडुरंग काकडे, श्रीमंत चव्हाण, विक्रम काकडे, कानिफनाथ काकडे आदि शेतकरी व ग्रामस्थ प्रमुख उपस्थितीत होते.

**CHANGE OF NAME**

I **Mrs.Shital Viresh Nibe** and **Mrs. Sheetal Viresh Nibe** are names of same person and wife of **Mr. Viresh Ashokrao Nibe.**

my **Adhar No is -484446414951**

# अहिल्यानगरमध्ये ढोल ताशांचा निनाद लागला घुमू

## गणेशोत्सवासाठी ढोल पथकांच्या सरावास उत्साहात सुरूवात

**(अभिजीत डांगे)**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गणरायांच्या आगमनाची चाहूल लागताच ढोल वादकांच्या अंगात चैतन्य निर्माण होते. वर्षभर जपून ठेवलेले ढोल आपसुकच बाहेर निघतात. आहिल्यानगरमध्ये ढोल-ताशा वादनाची अनेक वर्षांची परंपरा आहे. आगामी येऊ घातलेल्या गणेशोत्सवासाठी ढोल पथकांची जोरदार तयारी चालू झाली आहे.

नगर शहरामध्ये जवळपास दहा ढोल पथके आहे. या ढोल पथकांचा सराव साधारणतः गणेश चतुर्थीच्या अगोदर दोन महिन्यापासून चालू होतो. काही ढोल पथक हे दहा वर्ष अगोदर पासून नगर शहरात ढोल वाजवुन आपले वादन, कला सादर करतात. यामध्ये एका ढोल पथकामध्ये वादकांची संख्या जवळपास १०० ते १५० च्या आसपास असते. अगदी ५ वर्षांपासून ते ५० वर्षापर्यंत वादक सभागी असतात. या ढोल पथकामध्ये महिला ढोल पथकांचाही समावेश आहे.



नगर शहरात एकूण आठ ढोल पथक आहे. या पथकांमार्फत नगर शहरातील गणेशोत्सव साजरा केला जातो. ढोल हे आपली संस्कृती असून संस्कृतीचा जतन करण्याचं काम ढोल पथकातील वादक वृंद करतात. यामध्ये बरेच वादक स्वेच्छा व छंद जोपासण्यासाठी वादन करतात.

आमच्या ढोलपथकास १० वर्षे पूर्ण झाली आहे. या ढोलपथकात १७ ताशा, ५५ ढोल आहेत. वादकांची संख्या सुमारे ९० आहे. रोज २.५ तास सराव केला जातो. आमच्या ढोलपथकात १२ वर्ष ते ५० वर्षापर्यंत महिला पुरुष सहभागी झाली आहेत.

**-सागर आहेर,** नाद प्रतिष्ठान, पथक प्रमुख.

वादकांना कुठल्याही प्रकारचे मानधन दिले जात नाही. यावर्षी ढोलच्या पानांची किंमत हि मागील वर्षीपेक्षा २०० रुपयांनी वाढलेली आहे. त्यामुळे साहजिकच सराव करताना जर ढोल पथकाचे पान फाटले तर तो आर्थिक भुर्दंड ही ढोल पथकाचा पथक प्रमुखांना सहन करावा लागतो.

गणेशोत्सव च्या अगोदर दोन महिने सरावास सुरुवात झाल्यापासून बरेचसे ढोल पथके दहीहंडी पासून आपले वादन सादर करण्यास सुरुवात करतात. शहरात प्रामुख्याने रुद्रनाथ, रुद्रवंश, गणांत, नाद प्रतिष्ठान, तालयोगी, युगंधर, हिंदवी शौर्य, राम राज्य असे प्रमुख ढोल पथके आहे.



## संपादकीय

### पुन्हा हनी ट्रॅप

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात एका मोठ्या 'हनी ट्रॅप' प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. राज्यातील तब्बल ७२ वरिष्ठ अधिकारी आणि काही आजी-माजी मंत्री 'हनी ट्रॅप'मध्ये अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. नाशिकसह राज्यातील अनेक प्रमुख शहरांमध्ये सध्या एका मोठ्या 'हनी ट्रॅप' प्रकरणाची गुप्त चौकशी सुरू आहे. यामुळे प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. नाशिकमधील एका महिलेने पोलिस ठाण्यात दाखल होऊन यासंदर्भात केलेला दावा एकूणच शासन व्यवस्था किती किडली आहे, हे स्पष्ट करते. राजकीय नेते, मंत्री अधिकारी नको त्या मोहाच्या क्षणाचे बळी ठरतात आणि नंतर देश तसेच समाजासाठी अत्यंत हानीकारक तडजोड करतात. त्यात बेकायदेशीर बाबीही असू शकतात. सुंदर महिलांचा वापर करून नवीन लेदर करन्सीचा प्रकार वाढतो आहे. राज्याच्या राजकारणात आणि प्रशासनात अशा कथित प्रकरणांचे मोठे पडसाद उमटत आहेत. 'हनी ट्रॅप'मध्ये अडकलेल्या काही संशयित अधिकाऱ्यांनी तातडीने आपले मोबाईल फोन फॉरमॅट केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच, या प्रकरणात अडकलेले काही अधिकारी आणि राजकीय व्यक्तींनी आपले संबंध लपवण्यासाठी तसेच माहिती दडवण्यासाठी परस्परांमध्ये समन्वय साधल्याची माहिती आहे. या प्रकरणाची सध्या गुप्त पद्धतीने चौकशी सुरू आहे. या चौकशीमध्ये अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे. यात संशयित व्यक्तींचे व्हिडीओ कॉल्स, हॉटेलमधील भेटी आणि मोठे आर्थिक व्यवहार यांचे पुरावे तपास यंत्रणांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेता अनेक बड्या व्यक्तींनी 'तेरी भी चुप, मेरी भी चुप' या तत्वावर मौन बाळगले आहे. त्यामुळे हे प्रकरण गंभीर असल्याची चर्चा आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. यात अनेक बड्या नेत्यांची नावे समोर येण्याची शक्यता वर्तवली आहे.

महाराष्ट्राच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रदीप कुरुलकर यांना व्हॉट्सॲप आणि व्हिडीओ कॉलद्वारे पाकिस्तानी एजंटला भेटल्याबद्दल ताब्यात घेतले होते. तेव्हापासून असे आनखी प्रकार घडले असण्याची चर्चा सुरु होती. 'हनी ट्रॅप'शी संबंधित काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणणे अशी घटना प्रथमच घडलेली नाही. नोव्हेंबर २०२२ मध्ये दिल्ली पोलिसांनी कथितपणे भारतीय परराष्ट्र मंत्रालयासाठी काम करणाऱ्या एका ड्रायव्हरला अटक केली होती. तेव्हा सुरक्षा यंत्रणांनी पोलिसांना इशारा दिला होता की ड्रायव्हर कदाचित हनी ट्रॅपमध्ये अडकला होता आणि पाकिस्तानमधील व्यक्तीला गुप्तचर माहिती पुरवत असल्याची शंका होती. हेरगिरीच्या इतिहासातील कदाचित सर्वात प्रसिद्ध हनी ट्रॅप गुप्तहेर म्हणजे माता हारी. ती पहिल्या महायुद्धानंतर खूप लोकप्रिय झाली. नेदरलँड्सच्या मार्गरिट मॅक्लिओड, मोहक नृत्याच्या कलेमध्ये निपुण होती. तिच्यावर जर्मन सैन्यासाठी हेरगिरी केल्याचा आरोप होता. फ्रेंच-ब्रिटिश अधिकाऱ्यांशी जवळीक करून त्यांच्याकडून ती गुप्त माहिती मिळवत असे. त्यानंतर फ्रेंच सैनिकांनी तिला ठार केले. इतिहासानुसार, माता हरीवरील हनी ट्रॅपचे आरोप कधीच पूर्णपणे सिद्ध होऊ शकले नाहीत; परंतु तरीही अत्यंत गोपनीय कागदपत्रे शत्रूपर्यंत पोहोचवल्याचा आरोप असल्याने फ्रेंच सरकारने तिला शिक्षा केली. अशा प्रकरणांमधून पुढे येणारी माहिती एक तर मोठ्या रकमेच्या व्यवहारांसाठी वापरली जाते किंवा राजकीय कारणांसाठी, हेरगिरीचा त्याचा वापर केला जातो. गेल्या दोन दशकांमध्ये भारतासह अनेक देशांमध्ये हनी ट्रॅपची अनेक प्रकरणे नोंदली गेली आहेत, तिथे अवैध वसुली किंवा ब्लॅकमेलही केले जात आहे. बी. रामन यांच्या 'द काऊबॉईज ऑफ रॉ : डाउन द मेमरी लेन' या पुस्तकात एक अतिशय प्रसिद्ध कथा आहे. त्यानुसार मॉस्कोमध्ये पोस्टींग मिळवणारा एक तरुण भारतीय मुत्सद्दी अधिकारी रशियन नर्तकाच्या प्रेमात पडला होता. रशियाची गुप्तचर संस्था, 'केजीबी'ला त्या नर्तकाच्या माध्यमातून संबंधित मुत्सद्दीकडून काही माहिती घ्यायची होती. तेव्हा त्याने स्पष्ट नकार दिला आणि दिल्लीत येऊन सर्व प्रकार पंतप्रधान नेहरूंना सांगितला. अधिक सावधगिरी बाळगण्याची ताकीद देऊन या मुत्सद्द्याला माफ करण्यात आले; परंतु तेव्हापासून भारतीय परराष्ट्र सेवेच्या सर्व अधिकाऱ्यांना इतर देशांमध्ये असे कोणतेही प्रलोभन टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या. १९८० च्या दशकात भारतातील कथित हनी ट्रॅपचे प्रकरण तेव्हा चर्चेत आले होते. तेव्हा रिसर्च अँड ॲनालिसिस विंग (रॉ) चे अधिकारी के. व्ही. उन्नीकृष्णन यांच्यावर अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेच्या गुप्तहेराकडून हनी ट्रॅप झाल्याचा आरोप लावण्यात आला होता. रिपोर्टसनुसार ही महिला गुप्तहेर पॅन ॲम एअरवेजमध्ये एअर होस्टेस होती. उन्नीकृष्णन तेव्हा 'रॉ'च्या चेन्नईतील शाखेत तैनात होते. ते 'एलटीटीई'च्या कारवायांवर लक्ष ठेवून होते. १९८७ मध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील शांतता कराराच्या काही काळापूर्वी उन्नीकृष्णन यांना ताब्यात घेण्यात आले होते. अलिकडच्या दशकांमध्ये पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये तैनात असलेल्या भारतीय परराष्ट्र सेवेच्या प्रेस-माहिती सचिव माधुरी गुप्ता यांना महत्त्व प्राप्त झाले. २०१० मध्ये, दिल्ली पोलिसांच्या 'स्पेशल सेल'ने पाकिस्तानच्या 'आयएसआय' या गुप्तचर संस्थेला संवेदनशील माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक केली होती. २०१८ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने त्यांना तीन वर्षांची शिक्षा सुनावली, पण त्याच वेळी त्यांची जामिनावर सुटका केली गेली. न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले होते, की माधुरी गुप्ता यांनी संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयातील अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या पोस्टिंगची माहिती पाकिस्तानी हेरांना दिली होती. राज्यात अनेकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या या ताज्या प्रकरणाची पाळेमुळे मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे, आणि छत्रपती संभाजीनगर यासारख्या मोठ्या शहरांमध्ये पसरली आहेत. 'हनी ट्रॅपिंग' म्हणजेच प्रेमबंध किंवा लैंगिक संबंध निर्माण करून सावज हेरत रचलेले हनी ट्रॅप प्रकरणांचे जाळे चांगलेच विणले गेले आहे. त्यात अडकलेल्या अधिकारी, माजी मंत्र्यांकडून कोणती माहिती कुठे सरकली हे आता तपासून पहायला हवे.

# दलाई लामांच्या नियुक्तीचा वाद

**विश्वभ्रमण**

**– प्रा. जयसिंग यादव**



तिबेटचे धार्मिक नेते दलाई लामा यांचा उत्तराधिकारी ठरलेला नाही; परंतु या नियुक्तीवरून भारत आणि चीन यांच्यात मात्र नव्याने वाद सुरू झाला असून कटुता निर्माण होण्याची शक्यता आहे. चीनने तिबेटवर अनधिकृत कब्जा करणे, या प्रांतातील लोकांचे धार्मिक स्वातंत्र्य नाकारणे आणि त्यांच्या जीवनपध्दतीमध्ये सतत हस्तक्षेप करणे गेली अनेक वर्षे चर्चेत आहे. त्यामुळे हा विषय जगाचे लक्ष वेधत आहे.

तिबेटी धार्मिक नेते दलाई लामा यांनी त्यांची संस्था संपणार नाही आणि त्यांचा पुनर्जन्म निश्चितच होईल; पुढील दलाई लामा कोण असेल याचा निर्णय केवळ आध्यात्मिकरित्या घेतला जाईल, असे पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. दलाई लामा यांच्या या विधानानंतर चीनपासून अमेरिकेपर्यंत वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. तिबेटमधील बौद्ध समुदायात मात्र त्यांच्या या विधानाने आनंदाची लाट पसरली आहे. चीनला मात्र गेल्या काही वर्षांपूर्वी केलेल्या कायद्यानुसार दलाई लामांची निवड करण्याचा अधिकार स्वतःकडे हवा आहे. दलाई लामा आपल्या मर्जीतील असल्यास तिबेटवरील आपला अधिकार कायम राहील आणि जगभरातील तिबेटींमध्ये वेगळा संदेश जाईल, स्वतंत्र तिबेटीच्या चळवळीला शह बसेल, भारताचा हस्तक्षेपही थांबेल, असे चीनला वाटते; परंतु निर्वासित तिबेटी सरकारचे प्रमुख पेनपा त्सेरिंग यांनी चीनच्या या हस्तक्षेपाचा तीव्र निषेध केला आहे. ते म्हणाले की पुनर्जन्म हा राजकीय मुद्दा नाही तर पूर्णपणे आध्यात्मिक प्रक्रिया आहे. चीन यात हस्तक्षेप करू शकत नाही. दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण आणि कुठे असेल हे फक्त धार्मिक नेते स्वतः ठरवतात. हा चीनचा विषय नाही. त्यांनी चीनच्या हस्तक्षेपाला निराधार आणि अयोग्य म्हटले. पेनपा त्सेरिंग यांनी 'चीनने प्रथम तिबेटी संस्कृती, बौद्ध धर्म आणि मृत्यूनंतरचे जीवन समजून घेतले पाहिजे, असा सल्ला दिला. त्यांनी उपहासात्मकपणे म्हटले की, चीन खरोखरच पुनर्जन्मावर विश्वास ठेवत असेल तर प्रथम माओ झेडोंग, जियांग झेमिन इत्यादी नेत्यांचा पुनर्जन्म शोधला पाहिजे.

पेनपा त्सेरिंग यांनी 'गोल्ड कलश' प्रक्रियेंतर्गत पुढील दलाई लामाची निवड करावी, ही चीनची सूचनादेखील फेटाळली. त्यांनी सांगितले की ही प्रक्रिया १७९३ मध्ये चिंग राजवंशाने लादली होती. त्यामुळे तिबेटवरील नियंत्रण वाढवता येईल; परंतु त्यापूर्वी पहिल्या आठ दलाई लामांची निवड या प्रक्रियेशिवाय करण्यात आली होती. ही परंपरा तिबेटी संस्कृतीचा भाग नाही. दलाई लामांनी स्वतः म्हटले आहे की ते आणखी किमान वीस वर्षे जगतील आणि योग्य वेळ आल्यावरच उत्तराधिकाऱ्याशी संबंधित माहिती दिली जाईल. पेनपा त्सेरिंग यांनी चीनवर तिबेटमधील बौद्ध समुदायात फूट पाडण्याचा आरोप केला आहे. बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी आपल्या आत्मचरित्रात आणि मुलाखतींमध्ये आधीच सूचित केले आहे, की ते नव्वदीनंतर उत्तराधिकाऱ्याबाबत निर्णय घेतील. या वेळी धर्मशाळेतील मॅकलॉडगंज येथे त्यांचा तीन दिवसांचा वाढदिवस साजरा करणे हा केवळ एक उत्सव नाही, तर इतिहास घडवणारा आहे. कारण तो पुढील पिढीत बुद्धाचा प्रतिनिधी कोण असेल हे ठरवू शकतो. चीनचे याकडे लक्ष आहे. चीनचे म्हणणे आहे की दलाई लामा, पंचेन लामा आणि इतर उच्च बौद्ध गुरूंच्या पुनर्जन्माची प्रक्रिया केवळ गोल्डन अर्न म्हणजेच पारंपारिक लॉटरी प्रणाली आणि चीनच्या केंद्र सरकारच्या मान्यतेद्वारे पूर्ण केली जाईल. दलाई लामा यांनी हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला असून आपला उत्तराधिकारी कोणत्याही राजकीय आदेशाने ठरवला जाणार नाही, तर शुद्ध पारंपारिक तिबेटी बौद्ध पद्धतीनुसार ठरवला जाईल, असे म्हटले आहे. त्याला तुल्कु पद्धत म्हणतात. तुल्कू प्रणाली ही तिबेटी बौद्ध धर्माची एक अद्वितीय आणि पवित्र परंपरा आहे.

तुल्कू परंपरेनुसार मृत्यूनंतर दलाई लामांचा पुनर्जन्म होतो. त्यांचा आत्मा नवजात मुलामध्ये पुनर्प्रवेश करतो. या प्रक्रियेअंतर्गत एखादे मूल अचानक जुन्या वस्तू ओळखते, मंत्र जपते आणि मागील जन्माचे अनुभव सांगते तेव्हा बौद्ध धर्म केवळ आश्चर्यकारक मानत नाही, तर मागील जन्मातल्या महान गुरूचा म्हणजेच तुल्कूचा पुनर्जन्म मानतो. हा चमत्कार नाही, तर तिबेटी बौद्ध धर्माची सर्वात रहस्यमय आणि पवित्र परंपरा आहे. हीच 'तुल्कू' प्रणाली चीन राजकीय नियंत्रणाखाली घेण्याचा प्रयत्न करत आहेत. 'तुल्कू' हा तिबेटी शब्द आहे, ज्याचा अर्थ एक ज्ञानी व्यक्ती आहे, जो पुनर्जन्म घेतो आणि मानवजातीच्या कल्याणासाठी परत येतो. ही व्यक्ती सहसा मागील उच्च आध्यात्मिक गुरूचा (जसे की दलाई लामा किंवा पंचेन लामा) पुनर्जन्म मानली जाते. त्याची ओळख बालपणापासूनच होते, त्याला प्रशिक्षण दिले जाते आणि धार्मिक उत्तराधिकारी म्हणून स्थापित केले जाते. त्याच्या निवडीचे अनेक टप्पे आहेत. दलाई लामा यांनी अलिकडेच उत्तराधिकाऱ्याशी संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांनी स्पष्ट केले की भविष्यातही एक दलाई लामा असेल. म्हणजेच ही पवित्र संस्था सुरू राहील. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा खरा उत्तराधिकारी शोधला जाईल. याचा अर्थ असा की उत्सर्जनाची परंपरा पाळली जाणार नाही. यामध्ये दलाई लामा जिवंत असताना उत्तराधिकारी निवडतात. सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे दलाई लामा यांनी उत्तराधिकारी निवडण्याशी संबंधित संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी गाडेन फोड्रांग ट्रस्टवर सोपवली आहे. याद्वारे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की चीनने त्यांच्या जागी कोणाची नियुक्ती केली, तर ते अमान्य असेल.

तिबेटमधून १९५९ मध्ये निर्वासित झाल्यापासून चौदावे दलाई लामा यांनी हिमाचल प्रदेशमधील धरमशालाला आपला तळ बनवला आहे. येथेच ते तिबेटमधून आलेल्या किंवा भारतात जन्म लेल्या तिबेटी बौद्ध अनुयायांसोबत राहतात. तथापि, गेल्या काही दशकांमध्ये चीनने तिबेटचे चीनीकरण करण्याचे प्रयत्न वाढवले आहेत. त्यांनी या स्वायत्त प्रदेशाला झिझांग असे नवे नाव दिले आहे. दरम्यान, चीनने या धार्मिक रचनेवर नियंत्रण वाढवले आहे. चीनने असे कायदे केले आहेत, जेणेकरून सर्व लामांची निवड त्यांना अनुकूल पध्दतीने केली जाईल. तसेच, तिबेटमधील धार्मिक कार्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. चीनची तिबेटवरील पकड पाहता पंधराव्या दलाई लामांच्या पदावर नियुक्ती केली जाईल. तोच खरा उत्तराधिकारी असेल, हे चीनचे विधान गांभीर्याने घेतले पाहिजे. तिबेटमध्ये हिंसक निदर्शने झाली तरी चीनला पर्वा नाही. कारण तिथे त्याचे सैन्य वर्चस्व गाजवते. चीनला अमेरिकेचीही पर्वा नाही. अमेरिका तिबेटी प्रशासन आणि चौदाव्या दलाई लामांना पाठिंबा देते. चीनला लोकांच्या श्रद्धेची पर्वा नाही. सध्याचे दलाई लामा यांनी त्यांच्या 'व्हॉइस फॉर द व्हॉइसलेस' या पुस्तकात म्हटले आहे, की त्यांचा उत्तराधिकारी चीनव्यतिरिक्त मुक्त जगातून असेल.

चीन हे नाकारण्याचा प्रयत्न करत असला तरी दलाई लामांची संस्था संपवण्याचा मार्ग स्वीकारण्याची शक्यता कमी आहे. त्याऐवजी, ते पुनर्जन्म घेतल्याचा दावा करणाऱ्याचा शोध घेऊ शकतात. यासाठी त्यांनी २०१६ मध्ये एक ऑनलाइन प्रणालीदेखील तयार केली. उत्तराधिकारी म्हणून अनेक दावेदार समोर आले, तर चीन 'सुवर्ण कलश' प्रक्रियेद्वारे योग्य उत्तराधिकारी निवडण्याचा प्रयत्न करू शकतो. एक राजकीय प्रक्रियादेखील स्वीकारली जाऊ शकते. त्यात कम्युनिस्ट पक्षाप्रती नवीन दलाई लामांची निष्ठा तपासता येते. हे देखील शक्य आहे की ट्रस्टद्वारे एक दलाई लामा निवडला जाईल आणि चीनद्वारे दुसरा; म्हणजेच एकाच वेळी दोन दलाई लामा असतील. अशा परिस्थितीत, भारताला आपले धोरण ठरवण्यासाठी नैतिक आणि राजकीय-रणनीतिक दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. सध्याचे दलाई लामांचे केंद्र भारत आहे, म्हणून ते या प्रकरणापासून अंतर ठेवू शकते असे गृहीत धरणे ही एक मोठी चूक आहे. नैतिकदृष्ट्या, भारताला धार्मिक स्वातंत्र्य आणि निर्वासित तिबेटी बौद्ध समुदायाला त्यांचा उत्तराधिकारी निवडण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्याचे समर्थन करावे लागेल.

पान १ वरून

## डांगे आयुक्त की भ्रष्टाचाऱ्यांचे प्रवक्ते?

नाव न घेता काळे यांनी केला आहे. किरण काळे त्यांनी उघड केलेल्या स्कॅम आणि तक्रारीनंतर शिवसेनेचे खा. संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहिल्यानगरमधील स्कॅमबद्दल पत्र लिहून पुराव्यांची फाईल पाठवत गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती. त्यानंतर मनपा आयुक्त डांगे यांनी तात्काळ प्रसारमाध्यमांशी संवाद साधत खुलासे केले होते. आ. जगताप यांनी देखील राऊत, शिवसेनेवर टीका करत चौकशी झाली, असे म्हणत तसा भ्रष्टाचार झालाच नसल्याकडे अंगुली निर्देश केला होता. आयुक्त डांगे, आ. जगताप यांच्या वक्तव्यानंतर शहर शिवसेना आक्रमण झाली असून शहर प्रमुख काळे यांनी पत्रकार परिषद घेत त्याला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. यावेळी त्यांनी महत्त्वपूर्ण कागदपत्रे, पुरावेच प्रसार माध्यमांसमोर मांडत दूध का दूध पाणी का पाणी करून दाखवले आहे. यावेळी गौरव ढोणे, विलास उबाळे, महावीर मुथा, किशोर कोतकर, अनिस चुडीवाला, आकाश आल्हाट उपस्थित होते. काळे म्हणाले, स्वतः आमदारांनी सांगितले आहे की, निधी त्यांनी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे या कामाशी त्यांचा थेट संबंध असल्याची कबुलीच त्यांनी दिली आहे. सर्व ठेकेदार हे त्यांचेच कार्यकर्ते आहेत. जनतेच्या तिजोरीतील निधी हे मंत्रालयातून आणतात. मनपात जनता कर भरून कोट्यावधी रुपये जमा करते. यातून गरजेपेक्षा खूप अधिक वाढीव रकमांचे इस्टिमेट राजकीय दबावातून अधिकाऱ्यांशी संगणमत करून तयार करून घेतले जातात. या सगळ्यांमध्ये १० ते ४० पर्यंतची टक्केवारी आमदार आधी जमा करून घेतात. कारण ते खोक्यांच्या सरकारचे आमदार आहेत. त्यांच्या वरदहस्ताशिवाय एवढा मोठा स्कॅम होऊच शकत नाही. आमदार, मनपा अधिकारी, ठेकेदार यांची नार्को टेस्ट करा, अशी मागणी काळे यांनी केली असून त्यात सगळे पोपटासारखं बोलतील, असा टोला लगावला आहे. संजय राऊत हे शिवसेनेचे राष्ट्रीय फायर ब्रँड नेते आहेत. ईडीच्या दहशतीला न जुमानता कोणताही गुन्हा न करता देखील तुरुंगवास भोगून आलेले क्रांतिकारक आहेत. त्यांच्यावर टीका करण्याची पात्रता आमदारांची नाही. त्यांची ती उंचीही नाही. यापूर्वी ज्या नितेश राणेंना त्यांची उंची नाही असं म्हणणारे आज त्याच राणेंच्या बाजूला जाऊन ते बसले आहेत. भगव्याच्या, हिंदुत्वाच्या नावाने भ्रष्टाचार करत आहेत. यामुळे अन्य धर्मीय नागरिकांसह हिंदू नागरिकांना देखील नागरी सुविधांभावी त्रास होत आहे, असा आरोप काळे यांनी केला. काळे म्हणाले, डांगेंनी भ्रष्टाचाऱ्यांची, आमदारांची प्रवक्तेगिरी सुरू केली आहे. शहराची कामे करण्यापेक्षा कलेक्शन एजंट असणाऱ्या राजकीय हस्तक, ठेकेदार यांच्याबरोबर अँटी चेंबरमध्येच त्यांचा सगळा वेळ जातो. भ्रष्टाचारांचा तो अड्डा झाला आहे. मी ८ मे २०२३ ला पहिले पत्र याबाबत मनपा आयुक्त यांना दिले होते. त्यानंतर १५ मे, २२ मे, २३ ऑगस्ट २०२३, १४ जुलै २०२५ अशी एक नाही तर अनेक पत्र दिली आहेत. मला मनपाने २५ मे, २६ मे, २९ मे, ३१ मे २०२३ अशी एक नाहीतर अनेक वेळेला कधी अतिरिक्त मनपा आयुक्त, तर कधी उपायुक्त यांच्या समितीची नेमणूक चौकशीसाठी नेमणूक केल्याचं लेखी कळवलं आहे. मी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनासमोर या घोटाळ्यात गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी आत्मदहन करण्याचा इशारा २०२३ मध्ये दिला होता. त्यावर मला आत्मदहनाच्या आदल्या दिवशी पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीस स्टेशनमध्ये मला ३१ मे २०२३ ला आयुक्तांच्या मान्यतेने उपायुक्त, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता निंबाळकर यांनी दीड महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करून दोषींवरती गुन्हे दाखल करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

एवढं सगळं सुरू असताना आयुक्त म्हणतात की, अशी कोणती ही तक्रारच आलेली नाही. घोटाळा झालेला नाही. आयुक्त म्हणतात, शासकीय तंत्रनिकेतनचे टेस्ट रिपोर्ट बनावट असल्याबाबत मनपाकडे कोणती ही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. तक्रार नाही. ३० जून २०२३ रोजी अर्धशासकीय पत्र शासकीय तंत्रनिकेतनने आयुक्तांना पाठवत पाच सदस्यांच्या समितीने चौकशी अंतिम ७७६ कामांमध्ये शासकीय तंत्रनिकेतनच्या नावाने बनावट टेस्ट रिपोर्ट जोडले असून पोलीस विभागाने सांगितल्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याकरिता मनपाच्या ताब्यात असणाऱ्या गुन्ह्याच्या मूळ प्रति यांची मागणी केली होती. एवढेच नाही तर शासकीय निकेतनने आयुक्तांना १९ मे, २९ मे, २८ जून २०२३ ला याबाबत वेळोवेळी पत्र व्यवहार केला आहे. २२ जून २०२३ ला स्मरणपत्र देखील दिल आहे. मात्र याबाबतीत आयुक्तांचा खुलासा म्हणजे त्यांना त्यांच्या आकाकडून हा भ्रष्टाचार दडपण्यासाठी खोटी माहिती नागरिकांना देण्याचा आदेश झाल्यामुळे ते भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर करत आहेत. कार्यालयात ते ज्या खुर्चीत बसतात त्यामागे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा आहे. महाराजांच्या समोर बसून असं खोटं बोलणारे अधिकारी जर त्याकाळी असते तर महाराजांनी काय केलं असतं हे मी सांगण्याची गरज नाही. भ्रष्टाचारांना मदत करणे हा देखील भ्रष्टाचार असून या घोटाळ्यात आयुक्त डांगे यांच्यावर देखील गुन्हा दाखल करा, आरोपी करा, अशी मागणी यावेळी किरण काळे यांनी केली. मला काहीही माहित नाही. कोणतीही तक्रार समोर आलेली नाही. कोणताही घोटाळा झालेला नाही, असं वक्तव्य आणि प्रसार माध्यमांना माहिती आयुक्त डांगे यांनी दिली आहे. मुळात शिवसेनेने नेते संजय राऊत हे या देशाच्या कायदेमंडळाचे वरिष्ठ सभागृहाचे खासदार आहेत. त्यांनी आ. जगतापांवर गंभीर स्वरूपाचे आरोप त्यांच्या पत्रकार परिषदेत केले होते. आयुक्तांना नव्हे तर मुख्यमंत्र्यांना त्यांनी पत्र लिहिल आहे. त्या आरोपांना मात्र उत्तर हे आयुक्त पदासारख्या घटनात्मक प्रशासकीय पदावर असणाऱ्या व्यक्तीने दिले आहे. कायदेमंडळाच्या देशातील वरिष्ठ आणि ज्येष्ठ सदस्यांना अशा प्रकारे राजकीय उत्तर देणाऱ्या आयुक्तांवर हक्कभंग का आणला जाऊ नये ? असा सवाल काळे यांनी उपस्थित केला आहे. त्यातही उत्तर देताना धादांत खोटी माहिती त्यांनी मनपाच्या आयुक्त पदावरून प्रसारित केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर हक्क भंग आणण्याबाबत आम्ही कायदेशीर माहिती घेत असल्याचे काळे म्हणाले. यामुळे डांगे यांच्या अडचणीत भविष्यात वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत. आयुक्त डांगे हे आयुक्त नव्हे तर राजकीय कार्यकर्त्या प्रमाणे वागत आहेत. राजकारण करायची एवढीच हौस असेल तर त्यांनी कार्यक्षम, भ्रष्ट नसणाऱ्या, प्रामाणिक अधिकाऱ्यासाठी आमच्या महापालिकेच्या आयुक्तपदाची खुर्ची खाली करावी. राजीनामा द्यावा. खोके सरकारमध्ये सहभागी असणाऱ्या राष्ट्रवादीचे घड्याळ हातात बांधत पक्ष प्रवेश करून या शहरातून मनपाची निवडणूक लढवावी. मात्र नगरकरांना कुणाच्याही रिमोट कंट्रोलवर चालत वेठीस धरू नये. अन्यथा त्यांनी बदली करून घ्यावी, असा खोचक सल्ला काळे यांनी दिला आहे. आरोप झालेल्या काळात शिवसेना, भाजपचाच महापौर होता याबाबत प्रश्न विचारला असता काळे म्हणाले, शिवसेनेने जो भ्रष्टाचार उघड केला आहे त्या काळामध्ये भाजप व मिन्धे गटाचे आत्ताचे पदाधिकारी सत्तेच्या खुर्चीवर होते. वास्तविक पाहता त्यांना येथील जनतेने निवडून दिले ते शिवसेनाप्रमुख व पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, हिंदू धर्मरक्षक स्व. अनिल राठोड यांच्यावर असलेल्या विश्वासामुळे त्यांना निवडून दिले व ते नगरसेवक झाले हे ते विसरले. यांच्याकडे कोणता विश्वास आहे? यांची प्रवृत्ती विटा, वाळू, गोळा करायची आहे. रस्त्यासाठी हे लागत असते तस डांबर ही लागत असत. पण यांनी डांबर सुद्धा खाल्ल आणि आता तेच डांबर तोंडालाही फासल आहे, असा आरोप काळे यांनी केला आहे. आपल्या भ्रष्टाचाराच्या फायली उघडून गुन्हे दाखल होतील. या भीतीपोटीच शहराच्या ठाकरे सेनेतील नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या दारात जाऊन रडले. आम्हाला वाचवा म्हणून टाहो फोडला. शहराचे आमदार हे महायुती सरकारचे सदस्य आहेत. त्यामुळे सर्व भ्रष्टाचाऱ्यांना आता राजकीय संरक्षण मिळाले आहे. ते भाजप, महायुतीच्या वॉशिंग मशीनमध्ये स्वच्छ होत आहेत. मात्र जनता यांना माफ करणार नाही, असे किरण काळे म्हणाले.

पान १ वरून

## उद्धव ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

भेटीसाठी दाखल झाले आहेत. जनसुरक्षा विधेयकाबाबतीत महाविकास आघाडी राज्यपालांची भेट घेण्याचे नियोजन करत असून, याबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि काँग्रेसचे नेते उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. दरम्यान दुसरीकडे मुंबईत विजयी मेळावा पार पडल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मसने प्रमुख राज ठाकरे यांच्या युतीसंदर्भात देखील जोरदार चर्चा सुरू आहे, मात्र युतीसंदर्भात राज ठाकरे हे सावध भूमिका घेत असल्याचं पाहायला मिळत आहे.

## मंत्रालय, नाशिक, ठाणे हनीट्रॅपचे केंद्र? नाना पटोलेंचा आरोप

आहे. नाना पटोले म्हणाले, विधानसभा अध्यक्षांनी सरकारला निवेदन करण्याचे सांगितले. पण त्यांच्या सूचनेनंतरही सरकार त्यावर निवेदन करत नाही आणि उभे राहून उत्तरही देत नाही. या प्रकरणी महाराष्ट्राची बदनामी होत आहे. मंत्रालय, नाशिक व ठाणे हे हनीट्रॅपचे केंद्र बनले आहे. राज्याचे महत्त्वाचे दस्तऐवज या समाजविघातक संघटनाच्या हाती जात आहेत. मी कुणाचेही चारित्र्यहनन करत नाही. माझ्याकडे पेन ड्राईव्हही आहे. मला ते दाखवायचे नाही. पण एवढ्या गंभीर प्रकरणात सरकार निवेदन करण्यास तयार नाही. सरकारच्यावतीने अध्यक्षांचा अपमान करण्याचा प्रयत्न होत असेल तर विरोधक म्हणून आम्ही ते सहन करणार नाही. हा अतिशय गंभीर व ज्वलंत प्रश्न आहे. मी परवा निकृष्ट दर्जाच्या तांदळाचा प्रश्न उपस्थित केला. तुम्ही दस्तऐवज मागितले. आम्ही त्याची सरकारकडे विचारणा केली. पण अद्याप ते दस्तऐवज मिळाले नाहीत.

## दीपक काटेसह त्याच्या सहकाऱ्याला जामीन

केली होती. त्याच्या बॅगेत पिस्तुलाचे २ मॅगझिन व २८ काडतुसे सापडली होती. त्यानंतर पोलिसांनी त्याला ४ जानेवारी कोर्टात हजर केले. पण काटेवर यापूर्वी कोणताही गुन्हा नोंद नसल्याची बाब त्यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. पण प्रत्यक्षात त्यावेळी काटेवर २०२१ मधील २ व २०२३ मधील ३ असे एकूण ५ गुन्हे दाखल होते. २०१० च्या एका प्रकरणात त्याने ८ वर्षे तुरुंगवासही भोगला होता. त्यानंतर मुंबई हायकोर्टाने त्याची निर्दोष सुटका केली होती. पण पोलिसांनी याची कोणतीही माहिती कोर्टाला दिली नव्हती.

## झगडे फाटा-वडगाव पान रस्त्याची दुरुस्ती करा

विदेशातून येणाऱ्या साईभक्तांना या वाहतुकीचा त्रास होवू नये. यासाठी पूर्वीचा प्रमुख नगर-मनमाड राज्यमार्ग व सध्याचा एनएच ७५२ जी वरून उत्तरेकडून शिर्डीमार्गे दक्षिणेला येणारी सर्व वाहतूक पुणतांबा फाटा मार्गे याच झगडे फाटा-वडगाव पान फाटा रस्ता अर्थात राज्यमार्ग ६५ वरून मागील अनेक वर्षापासून वळविली जात आहे. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त वाहनांची वर्दळ या मार्गावरून होत असल्यामुळे हा रस्ता अतिशय खराब झाला होता. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आ. काळे यांनी पाठपुरावा केल्यामुळे राज्य शासनाने १७ कोटी निधी मंजूर करून त्यापैकी १० कोटी निधीतून या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली होती. परंतु, मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असल्यामुळे वारंवार दुरुस्ती करूनही हा रस्ता टिकत नाही. परंतु, दुरुस्ती करूनही हा रस्ता पुन्हा काही ठिकाणी अतिशय खराब झाला होता. ज्या ठेकेदाराला या रस्त्याचे काम दिले आहे त्याच ठेकेदाराला पुन्हा दुरुस्तीचे काम देण्यात आले होते. आजपर्यंत त्या ठेकेदाराकडून आत्तापर्यंत तीन वेळा दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. तरी देखील रस्ता दुरुस्त झालेला नसून झगडे फाटा ते तळेगाव दिघे ह्या १७ किलोमीटरच्या रस्त्यापैकी साडे तीन किलोमीटर रस्ता तर खूपच खराब झाला असून खराब रस्त्यामुळे छोटे-मोठे अपघात होत आहे. या रस्त्याला देण्यात आलेल्या सतरा कोटी निधीपैकी शिल्लक असलेला सात कोटी निधी तातडीने देवून या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी आ. काळे यांनी केली आहे.

## कुंभमेळ्यापूर्वी शिर्डी विमानतळावरील कामे पूर्ण करा

महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणेचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, मुख्य वित्त अधिकारी अनिशा गोदानी आदी उपस्थित होते. शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरण व नुतनीकरणाच्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिर्डीतील विमानतळावरील नवीन एटीसी इमारत, नवीन एकात्मिक मालवाहतूक इमारत, नवीन टर्मिनल इमारतीची कामे प्रस्तावित आहेत. ही कामे आगामी कुंभमेळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. मात्र, ही कामे संथगतीने सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक वाटल्यास अतिरिक्त मनुष्यबळ वापरावे. तसेच विमानतळासाठी आवश्यक असणारी खरेदी व स्ट्रक्चरल डिझाईनची कामे येत्या आठवड्यात पूर्ण करावीत. उपमुख्यमंत्री पवार यांनी पुरंदर विमानतळाचे काम लवकर सुरू व्हावे, यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी. तसेच त्याठिकाणी मोठी विमाने उतरण्याची सोय असावी. त्यासाठी आतापासूनच आवश्यक ती काळजी घ्यावी. या विमानतळावर विमानांच्या हँगरचीही व्यवस्था असावी, असे सांगितले. महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष स्वाती पांड्ये यांनी सादरीकरणाद्वारे शिर्डी व पुरंदर विमानतळाच्या कामांची माहिती दिली. शिर्डी विमानतळासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागार कंपनी व कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधींनीही माहिती दिली. पुरंदर विमानतळासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे आता या विमानतळासाठी लागणारी जमिन संपादीत करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पुणे जिल्हाधिकारी यांनी तातडीने सुरू करावी. जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. हे विमानतळ सुरू झाल्यावर महाराष्ट्रातील विमानसेवा आणखी वाढणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# शिरूर ते बेल्हा रस्त्याचे काम अत्यंत धिम्या गतीने

## मुरमाऐवजी मातीचा वापर, धोकादायक फलक नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** शिरूर ते बेल्हा या केंद्र शासनाच्या अंतर्गत सुरू असलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे रस्ते विकास काम धीम्या गतीने सुरू असून वाहनधारकांच्या सुरक्षेकडे मात्र दुर्लक्ष केले जात आहे.

शिरूर, राळेगण थेरपाळ, जवळा, निघोज, देवीभोयरे, देवी भोयरे फाटा, लोणी मावळा, रांधे फाटा, अळकुटी, बेल्हा पर्यंतच्या गावांमधून हा राष्ट्रीय महामार्ग जात असून या राष्ट्रीय महामार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. ठिकठिकाणी असणाऱ्या गावांमध्ये, ओढ्यावर पूल उभारण्याचे काम ही धीम्या गतीने सुरू आहे. या पुलावर अगदी साध्या स्वरूपात धोकादायक दिशा



### रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या झाडांवर कुऱ्हाड

गावांचा, राज्यांचा व देशाचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी रहदारी व त्याकरिता रस्ते मजबूत व प्रशस्त हवे आहेत. सध्या सुरु असलेल्या कामांमुळे रस्त्याच्या कडेला असणारी लिंब, आंबा, बाभूळ, करंज, वड , उंबर वा इतर अनेक झाडांची अक्षरशः कत्तल करण्यात आली आहे. झाडे तोडणे सोपे आहे, पण झाडे लावून त्याचे संगोपन करून ते वाढविणे आवश्यक आहे. रस्ता प्रशस्त होणार आहे, पण झाडांची कत्तल झाल्यामुळे निसर्गाची फार मोठी हानी होत आहे व झाली आहे, परिसर अक्षरशः भकास झाला आहे, पण याकडे कोण लक्ष देणार? असा सवाल व्यक्त होत आहे.

दर्शक फलक लावण्यात आले आहे. पक्के व मजबूत कठडे न लावल्याने वाहन धारकांना या कच्च्या पुलावरून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.

यदाकदाचित एखादे वाहन या पुलासाठी खोदलेल्या खड्ड्यात पडून जीवित हानी होण्याची जास्त शक्यता आहे. यासंदर्भात या महामार्गाच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी कल्पना दिली, पण त्यांना लक्ष देण्यास वेळच मिळाला नसेल. यामुळे सामान्य व्यावसायिक, शेतकरी व प्रवाश्यांना भीत भीत तोंड द्यावे लागते. सुरक्षिततेचा, आरोग्याचा व जिवितहानीचा धोका निर्माण झाला आहे.

दोनही बाजूचे काम एकाचवेळी सुरू असून यामुळे वाहतूक व्यवस्था धोक्यात आली आहे. नियमानुसार एका बाजूचे काम पूर्ण करून मग दुसऱ्या बाजूचे काम करणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात दोन्ही बाजूचे खोदकाम व मुरूम माती टाकण्याचे काम एकाच वेळी सुरू आहे. डंपरमध्ये साहित्य टाकताना प्रवाश्यांवर माती, खडे, दगड उडून लागतात, डंपर रस्त्याच्या मध्यभागी उभे करून त्यात जेसीबीने मुरूम, दगड टाकले जातात. पावसामुळे चिखलात घसरून अनेक अपघात झाले आहेत. दोन्ही बाजूला काळी माती, पोयटा माती आणि मुरूम मोठ्या प्रमाणावर साचलेले आहे. दुचाकी गाड्या घसरून अनेक लोक पडत आहेत, महिलांची संख्या विशेषतः जास्त आहे.

# तडजोड न करता थेट फायनान्स कंपनीने घेतला घराचा ताबा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** कर्जाची रक्कम थकल्याने तडजोड न करता थेट एका मागासवर्गीय कुटुंबीयांच्या घराचा ताबा घेऊन त्यांना बेघर करणाऱ्या सावेडी येथील त्या फायनान्स कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले. यावेळी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, धडक कामगार संघटनेचे श्रीधर शेलार, सहादू दोंदे, आम आदमी पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या शिंदे, उमेद सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, तक्रारदार विजय लोंढे, अंबादास जाधव, राहुल सोनकांबळे, रवी सातपुते आदी उपस्थित होते.

सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, विजय लोंढे यांनी सन २०१७ मध्ये सावेडी येथील एका फायनान्स कडून १४ लाख ४७ हजार रुपयाचे कर्ज घेतले होते. सदर फ्लॅट हा अपूर्ण असताना त्या फायनान्स कंपनीने कर्जाची पूर्ण रक्कम बिल्डर यांच्या ताब्यात दिली. यामुळे संपूर्ण कर्जाचा हप्ता सुरु झाला. पंतप्रधान आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी वेळोवेळी अर्ज करुन देखील जाणीवपूर्वक योजनेचा लाभ मिळवून दिला नाही. ज्या बँकेत पगार जमा होते, त्या बँकेतून हप्ता कट करण्यात यावा! असे वेळोवेळी सूचना करुनही जाणीवपूर्वक जुन्या खात्यामधूनच हप्ता घेण्यासाठी चेक टाकत राहिले. ऑनलाइन स्वरूपात सुद्धा हप्ता देण्याची तयारी दर्शवून देखील फायनान्स कर्मचाऱ्यांच्या आडमुठेपणामुळे त्यांचे खाते एनपीए मध्ये गेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# घरफोडी करणारे चार आरोपी जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** आहिल्यानगर तसेच भिंगार परिसरात घरफोड्या करणाऱ्या चार आरोपींना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धुळे येथूल गजाआड केले आहे.

फिर्यादी केवळकुमार भगवानदास गांधी (रा. सारसनगर, अहिल्यानगर) हे दिनांक ३ जुलै रोजी बाहेरगावी गेले असता अज्ञात आरोपींनी त्यांचे राहते घराचे कुलूप तोडून घरामध्ये प्रवेश करून सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरून नेले.याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. पोलीस अधिक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस जिल्हयातील ना उघड घरफोडीच्या गुन्हयांचा समांतर तपास करून, गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने पोलिसांची पथके तयार करुन गुन्ह्यातील आरोपींची माहिती व शोध घेणेबाबत सुचना व



मार्गदर्शन करुन पथकास रवाना केले. सदर पथकास गुन्ह्याचे तपासात गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे रेकॉर्डवरील आरोपी नामे कैलास चिंतामण मोरे (रा.सोनगीर ता. जि. धुळे) याने त्याच्या साथीदारासह केला असून ते धुळे शहरात असल्याची माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने धुळे येथे आरोपीतांचा शोध घेऊन कैलास चिंतामण मोरे व जयप्रकाश राजाराम यादव यांना ताब्यात घेतले. ताब्यातील आरोपीकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस करता त्यांनी नमूद गुन्हा त्यांचे साथीदार विरेंद्रसिंग रामकेवलसिंग ठाकुर, सोपान पाटील यांनी केल्याचे सांगितले.आरोपींनी ज्या सोनारांदा दागिने विकले ते सोनार रविंद्र आनंद माळी व सुनिल ईश्वर सोनार यांनाही ताब्यात घेण्यात आले.

### चोरीचे सोने घेणारे सोनार गजाआड

पथकाने आरोपी कैलास चिंतामण मोरे व जयप्रकाश राजाराम यादव यांना विश्वासात घेऊन त्यांनी आणखी कोठे गुन्हे केले आहेत काय याबाबत चौकशी केली असता त्यांनी त्याचे वर नमूद साथीदारासह अहिल्यानगर शहरात केलेल्या घरफोडीचे गुन्हे केल्याच्या सांगीतलेल्या माहितीवरून खालीलप्रमाणे ०४ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

# हिंदू एकताचा आज मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** हिंदू एकता आंदोलन पक्षाचा आज शुक्रवार दि.१८ रोजी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यामध्ये पक्षाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून राज्यात येत्या येणाऱ्या स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पक्ष स्वबळावर लढविणार असून या विषयावर विचारविनिमय करण्यात येणार आहे. तसेच नवीन युवकांना कार्यकारिणीमध्ये देवून समाजसेवेची संधी देण्यात येणार आहे. पक्षाच्या कार्यकर्त्यांना येत्या निवडणुकांसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा मेळावा श्रेयस सिद्धी बैंक्वेट हॉल, लोटस बिल्डींग, पंचमी हॉटेलजवळ, पुणे सातारा रोड येथे होणार आहे. मेळाव्यात राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, प्रदेशाध्यक्ष सुदर्शन शितोळे, प्रदेश सरचिटणीस दिपक ढवळे, सांगली जिल्हाध्यक्ष सरदार दत्तात्रय शेळके, युवा अध्यक्ष अमित सूर्यवंशी हे मार्गदर्शन करणार आहे. या मेळाव्याचे आयोजक पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संतोष जगताप, पुणे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कापसे, पुणे शहराध्यक्ष रवी संघवी यांनी आयोजन केले आहे. या मेळाव्यास नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, सोलापूर, ठाणे आदी ठिकाणाहून उपस्थित राहणार आहेत.

# निमगाव खैरी ते नाऊर रस्त्याची दुरावस्था

## नायगाव ग्रामस्थांचे ना.विखे पाटील यांना निवेदन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील निमगाव खैरी ते नाऊर या ११ कि. मी. रस्त्याची खड्डयांनी अक्षरशः चाळणी झाली असुन या रस्तावर वाहन चालवणे सोडा तर पायी चालणे मुश्किल झाले आहे. ठिक - ठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमुळे वाहन चालकांकडून छोटे मोठे अपघात होत असून, एस.टी. महामंडळाची बससेवा खड्डयामुळे बंद अथवा रद्द केली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जनसेवा मंडळ, नायगाव व ग्रामस्थांनी एकत्र येत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना साकडे घालत निवेदन दिले. हे निवेदन माजी सभापती दिपकराव पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देताना सुभाष लांडे, बाळकृष्ण भोसले, साईनाथ लांडे, बाबासाहेब राशिनकर, अविनाश लांडे, कैलास आदमने, ॲड. प्रशांत राशिनकर तसेच जनसेवा मंडळाचे कार्यकर्ते व नायगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.नामदार विखे पाटील यांनी लोकहिताच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून रस्त्याचे काम त्वरीत करण्याच्या सुचना दिल्या. या रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू होईल, असे आश्वासन ना. विखे पाटील यांनी दिले.

# जिल्हा कार्याध्यक्षपदी ज्ञानेश्वर साबळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या राहाता तालुका प्रसिद्धीप्रमुखपदी शंकर सोनवणे तर अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर साबळे यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी अनेक सामाजिक कार्यात सहभाग घेतलेला आहे. त्यांची निस्वार्थ सेवा आणि संघटनेतील योगदानाला पाहून संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. सारिकाताई नागरे यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. श्री श्री श्री १००८ महामंडलेश्वर श्री दत्तात्रय दहिवाळ महाराज (दत्त दिगंबर पीठ लाडगाव, छत्रपती संभाजी नगर) यांच्या आशीर्वादाने ही निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे राष्ट्रीय प्रसिद्धीप्रमुख रवीशेठ माळवे, संदिप मानकर, प्रदेश संपर्क प्रमुख संजय तळेकर मूर्ती, मुक्ताताई डहाळे आदींनी स्वागत केले आहे.

# सहयोग क्रीडातर्फे शालेय साहित्य वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव फुणगी येथील विद्यार्थ्यांना सहयोग क्रीडा मंडळ एरंडोली तालुका श्रीगोंदा यांच्यातर्फे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कुठल्याही शैक्षणिक अनुपलब्धतेमुळे शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येऊ नये, म्हणून सहयोग क्रीडा मंडळाचा हा अनोखा उपक्रम आहे, असे प्रतिपादन मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब इथापे यांनी यावेळी केले.

शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर आपण यश मिळवूच शकतो, असे मंडळाचे सदस्य तथा खोखोचे राष्ट्रीय पंच राजेंद्र भालेराव यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. ग्रामीण भागातील आणि सर्वसामान्य परिस्थितीत, संघर्ष करता करता क्रीडा मंडळाला इतक्या यशाच्या शिखरापर्यंत नेल्याबद्दल पिंपळगावचे सरपंच शिवाजीराव जाधव यांनी इथापे यांचे कौतुक केले.आधुनिक काळात अशा प्रकारचे दातृत्व असणाऱ्या कमी व्यक्ती असतात असे शाळेचे माजी मुख्याध्यापक अशोक भोसले यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यवस्थापन समिती अध्यक्ष नंदूभाऊ वडितके, सदस्य किशोर बोरुडे, संदीप तोरे महेश डमाळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश ब्राह्मणे, सुंदर सोबले, प्रल्हाद क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गीताराम पवार यांनी केले.

# जनावरांचे लम्पी प्रतिबंधात्मक लसीकरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** गोवंशीय जनावरांमध्ये आढळणारा व दुग्ध उत्पादनावर परिणाम करणारा लम्पी आजाराचा प्रादुर्भाव वाढत असताना निमगाव वाघा (ता. नगर) येथे गोवंशीय जनावरांना लम्पी प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिम सुरु करण्यात आली. डोंगरे वस्तीवर जनावरांना लम्पी प्रतिबंधात्मक लस देण्यात आली. यावेळी एल. एस. एस. बजरंग उरमुडे, ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे, जालिंदर जऱ्हाड, मंदाताई डोंगरे आदी उपस्थित होते.



डोंगरे म्हणाले की, जिल्ह्यात पुन्हा लम्पी आजाराचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी सौम्य लक्षणाची जनावरे सापडत आहे. हा प्रादुर्भाव वेळीच रोखण्यासाठी लसीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी जिल्ह्यात लम्पी आजाराचा उद्रेक झाला होता. त्यावेळी सुमारे साडेचार हजारांवर जनावरे मृत्युमुखी पडली. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लसीकरण करण्याचे आवाहन त्यांनी केले. तर या आजाराचा प्रादुर्भाव गोचीड, माशा, डासांमुळे होतो. त्यामुळे गोठा स्वच्छ ठेवणे व गोचीड, माश्यांचा प्रादुर्भाव होणार नाही, याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

# कामिका एकादशीच्या पार्श्वभूमीवर बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** यावर्षी सोमवार दि. २१ जुलै रोजी असलेल्या आषाढ वद्य (कामिका) एकादशी निमित्त नेवाशात होणारी लाखो भाविक वारकऱ्यांची गर्दी लक्षात घेवून भाविकांच्या सुविधांसाठी तहसीलदार यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक पार पडली.

कामिका एकादशीच्या दिवशी ज्ञानेश्वर मंदिरात दरवर्षी लाखोंच्या संख्येने भाविक पैस खांबाच्या दर्शनासाठी येतात. भाविकांच्या सुविधांसाठी नियोजनबद्ध पद्धतीने विविध विभागांनी समन्वय साधून तयारी सुरू केली आहे.तहसील कार्यालयात आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या सूचनेनुसार नियोजन बैठक पार पडली. बैठकीस तहसीलदार संजय बिरादार, संत ज्ञानेश्वर



मंदिर ट्रस्टचे प्रतिनिधी रवींद्र जमधाडे, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, नगरपंचायतचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, परिवहन विभागाचे प्रशांत होले, सार्वजनिकबांधकाम विभागाचे बी. टी. सोनवणे, आरोग्य विभागाचे पुंड, महावितरणचे राहुल बडवे आणि व्ही. पी. कानडे, महसूल मंडळाधिकारी अनिल गव्हाणे व तलाठी परदेशी उपस्थित होते.

रस्त्यांची डागडुजी, मंदिर परिसरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, मोबाईल टॉयलेट्स, पार्किंग व्यवस्था, अग्निशामक व्यवस्था, आरोग्य पथकांची नियुक्ती, वाहतूक नियंत्रण आणि पोलीस बंदोबस्त या सगळ्या यंत्रणा भाविकांची सेवा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या उपाय योजना या बाबत बैठकीत नियोजन करण्यात आले.

# गुणवंतच्या पाठीवर शाबासकीचा हात गरजेचा

## नानजीभाई ठक्कर; गुणवंत विद्यार्थ्यांचा केला सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कुठल्याही गुणवंताच्या पाठीवरनं जोपर्यंत शाबासकीचा हात फिरत नाही, तोपर्यंत त्याच्यापासून इतरांना प्रेरणा तयार होणे अशक्य असतं म्हणून सर्व गुणवंतांचा सत्कार करणं हे समाजाच्या प्रत्येक घटकाचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन दानशूर व्यक्तिमत्व नानजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील आत्मा मालिक आश्रम ट्रस्ट कोकमठाण येथे व्हाइस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या कोपरगाव तालुका कार्यकारिणीच्या वतीने तालुका व




परिसरातील दहावी-बारावीच्या परीक्षेत उच्चश्रेणीत उत्तीर्ण झालेले गुणवंत विद्यार्थी तसेच विविध कला क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रात स्वतःची ओळख करणाऱ्या ओळख निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सन्मान आयोजित करण्यात आला होता. या समारंभासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्व उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरुन ठक्कर बोलत होते. कार्यक्रमास खासदार भाऊसाहेब वाकचौरे, राष्ट्रसंत गुरुवर्य ज्ञानेशानंद शास्त्री महाराज, कृषीभूषण प्रभावती घोगरे, सद्गुरु उद्योग समूह नाशिकचे अध्यक्ष श्रीकांत सहाने, कुलदीप फौंडेशन अध्यक्ष कुलदीप देशमुख, वसंतदादा मल्टीस्टेट शिर्डीचे चेअरमन मुकुंद सिंनगर, व्हाईस ऑफ मीडिया जिल्हाध्यक्ष गोरख मदने, सचिव मतकर, कार्यकारिणी सदस्य डॉ. तानाजी लामखडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी गुरुवर्य ज्ञानेशानंद शास्त्री महाराज, प्रभावती घोगरे, श्रीकांत सहाने कुलदीप देशमुख आदी मान्यवरांनी उपस्थिताना अनमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी तालुका अध्यक्ष प्रशांत टेके यांनी प्रास्ताविक केले. तालुका उपाध्यक्ष सुमित दरेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### मान्यवरांचा केला सत्कार

मान्यवरांचा सत्कार संघटनेचे सचिव बापू घुमरे खजिनदार नामदेव कोळपे, संघटक प्रल्हाद मेहरे, सदस्य दिनेश जोशी, सदस्य रवींद्र भालेराव, शहर उपाध्यक्ष महेश सिनारे यांच्या हस्ते पार पडले. हा कार्यक्रम सर्व कार्यकारणी सदस्यांनी मेहनत घेऊन यशस्वीपणे आयोजित केला. सदर कार्यक्रमच्या यशस्वी आयोजनासाठी आत्मा मलिक संकुलातील सर्व महंतांचे आशीर्वाद ,अध्यक्ष सूर्यवंशी साहेब, व्यवस्थापक सुनील पोकळे व सर्व स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# प्रवीण गायकवाडांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ मोर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा होणार असल्याची माहिती राहुरी शहरातील समविचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर रविवारी अक्कलकोट येथे शिवधर्म प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात प्रवीण गायकवाड यांच्या समर्थनार्थ महाराष्ट्रात अनेक ठिकाणी निषेध नोंदविण्यात आला. त्याच अनुषंगाने संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज, शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी तहसील कार्यालय, राहुरी या ठिकाणी सकाळी १०:३० वाजता निषेध सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या निषेध सभेस माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासह राजकीय, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित राहणार आहे.आज होणाऱ्या निषेध सभेत शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारधारांच्या संघटना व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खर्डा बसस्थानकात महिलांची सुरक्षा ऐरणीवर!

## अनेक गाड्या बंद; प्रवाशांची होतेय मोठी गैरसोय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : उस्मानाबाद व बीड या तीन जिल्ह्याच्या सरहद्दीवर असलेले ऐतिहासिक खर्डा गावात शिर्डी- हैदराबाद राज्य महामार्गावर सुसज्ज असे खर्डा बसस्थानक कार्यान्वित आहे. मात्र या बसस्थानकात संध्याकाळी सात नंतर महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. या बस स्थानकात वाहतूक नियंत्रक असून सकाळी नऊ ते पाच या वेळेतच ऑफिस चालू राहते. रविवारी सुट्टी असते. त्यामुळे रात्रीच्या वेळेत प्रवाशांची व विशेष करून महिलांची सुरक्षा रामभरोसे आहे.

या परिसरात तळीरामाची संख्या रात्रीच्या वेळी जास्त असल्याने खर्डा पोलिसांनी या परिसरात लक्ष ठेवण्याची गरज आहे. तसेच खर्डा या ठिकाणी पूर्वी बार्शीला रुग्णांच्या उपचारासाठी बार्शी- खर्डा ही गाडी मुक्कामी होती. सन २०२४ मध्ये खर्डा ग्रामपंचायतने बार्शी येथे आगार प्रमुखाकडे गाडी सुरू करण्याची मागणी केली होती. परंतु बार्शी- खर्डा व बार्शी जामखेड या दोन्ही गाड्या अनेक दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. जामखेड आगार प्रमुख यांनी लक्ष घालून गाडी चालू करावी, अशी मागणी होत आहे. बसस्थानक परिसराला वॉल कंपाऊंड नसल्यामुळे संरक्षक भिंत होणे गरजेचे आहे. त्यामुळे गावात फिरणारी मोकाट जनावरे व खाजगी वाहने परिसरात गर्दी करतात. तसेच या बस स्थानकात दूरध्वनी क्रमांक उपलब्ध नाही. या ठिकाणी पार्सलची व्यवस्था नाही. स्वच्छता कर्मचारी दोनशे रुपये रोजाप्रमाणे कंत्राटी नेमणूक आहे. त्यामुळे कायमस्वरूपी स्वच्छता कर्मचारी असावा अशीही मागणी होत आहे . रविवारच्या दिवशी येथील स्वच्छतागृह बंद असते. त्यामुळे या दिवशी महिलांची गैरसोय होते.




खर्डा येथे सुसज्ज असे बस स्थानक आहे. स्वच्छतागृह चालू आहे. मात्र रविवारी सुट्टी असल्याने ते बंद असते. खर्डा बार्शी गाडी सुरू करण्याबाबत वरीष्ठ अधिकारी यांना कळविले जाईल.रात्रीची गैरसोय होत असल्याने वरिष्ठांना तसे कळवू.

**-बाळासाहेब जायभाय,**
**वाहतूक नियंत्रक, खर्डा.**

# पुणतांब्यात कामिका एकादशीनिमित्त यात्रा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : महाराष्ट्राची दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथे येत्या २१ जुलै रोजी कामिका एकादशीनिमित्त भरणाऱ्या यात्रेची जय्यत तयारी सुरू करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे विश्वस्त महेश मुरूदगण यांनी दिली. आषाढ महिन्यातील पहिल्या एकादशीला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्य यात्रा भरत असते. त्यानंतर येणाऱ्या आषाढ वद्य एकादशीस श्रीक्षेत्र पुणतांबा येथे यात्रा भरत असते. चालू वर्षी किमान दोन लाख भाविक हजेरी लावण्याची शक्यता आहे. त्यामुळे दर्शन बारीत भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधा, बाहेर गावाहून किमान २०० पेक्षा जास्त दिंड्या, आणि एकादशीनिमित्त मंदिरात आयोजित करण्यात येणारे विविध धार्मिक कार्यक्रम याबाबतचे नियोजन करण्यात येत आहे. कामिका एकादशीच्या पर्वावर १७५ वर्षांपासून परंपरा असलेल्या सद्गुरु गंगागिरी महाराज नाम सप्ताहाची औपचारिक घोषणा पुणतांबा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या किर्तनात सराला बेट येथील गोदाधामचे महंत रामागिरी महाराज करणार आहेत. तसेच सप्ताहाचे आयोजन करणाऱ्या गावात सप्ताहाचे श्रीफळ देणार आहेत. चालू वर्षी गोदावरी नदी दुथडी भरून वाहत असून पाऊस आणि पाणीसुद्धा समाधानकारक असल्यामुळे भव्य यात्रा भरणार असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.



# रजिस्टरमध्ये खाडाखोड करुन जातीत बदल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील देहरे येथील करंडेवस्ती केंद्र जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या जनरल रजिस्टरमध्ये खाडाखोड करत दाखल्यावरील जातीत बदल केला असून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांच्याकडे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे, संबंधित शिक्षकाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, करंडेवस्ती यांनी त्यांना अधिकार नसताना जनरल रजिस्टरमध्ये विद्यार्थ्यांच्या जातीमध्ये खाडाखोड करून अहिल्यानगर जिल्हा परिषद प्रशासनाचा कोणताही आदेश नसताना बदल केला आहे.

विद्यार्थ्यांच्या जनरल रजिस्टरमध्ये खाडाखोड करुन जातीत बदल करावा यासाठी माझ्यावरही संबंधितांकडून दबाव टाकण्यात आला. मी नकार दिल्याने ग्रामसेवकावर दबाव आणून ग्रामसभेत ऐनवेळी माझ्या बदलीचा ठराव घेण्यात आला. प्रशासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी जि. प. प्राथमिक शाळा, करंडेवस्ती केंद्र, देहरेचे मुख्याध्यापक विलास पगारे यांनी केली आहे.

# डाक विभागाचे कामकाज सोमवारी राहणार बंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : भारतीय डाक विभागातर्फे पोस्ट कार्यालयामधील आयटी-२.० मायग्रेशन अंतर्गत नवीन सॉफ्टवेअरचे काम होणार असल्याने श्रीरामपूर डाक विभागाचे कामकाज सोमवार दि. २१ जुलै रोजी बंद राहणार आहे. पोस्ट विभाग अंतर्गत पुढच्या पिढीच्या एपीटी एप्लीकेशनचे रोल आउट लवकरच होत आहे. हा कार्यक्रम श्रीरामपूर विभागातील सर्व पोस्ट कार्यालयांमध्ये दि. २२ जुलै रोजी अंमलात आणला जाणार आहे. यादरम्यान २१ जुलै रोजी नियोजित डाऊनटाइम ठेवण्यात येणार आहे, त्यामुळे या दिवशी कोणतेही सार्वजनिक व्यवहार श्रीरामपूर विभागातील पोस्ट कार्यालयांमध्ये होणार नाही. ही व्यवस्था डेटा मायग्रेशन, सिस्टीम पडताळणी आणि सेटअप पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहे, जेणेकरून पुढील प्रणाली सुरळीतपणे कार्यरत होऊ शकेल. एपीटी एप्लीकेशन अधिक जलद, सुटसुटीत आणि ग्राहकस्नेही सेवा देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. तरी, डाक विभागाच्या ग्राहकांनी तात्पुरत्या अडथळ्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन डाक अधीक्षक, श्रीरामपूर यांनी केले आहे.

# वाळू वाहतुकीमुळे नागरिकांच्या जिवितास धोका

## रस्त्याला पडले मोठे भगदाड; भरधाव वेगाने चालतात वाहने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड नं. ६, कांदा मार्केट, कौसल्यानगर, खिलारी वस्ती आदी परिसरातून वाळू डबर, मुरूम आदी जड वाहनांची वाहतूक रात्रंदिवस सुरू असल्यामुळे नगरपालिकेने तयार केलेल्या डांबरी व खडीकरण रस्त्यास मोठे खड्डे पडले आहेत. शिवाय पायी चालणारे नागरीकांना भरधाव वेगात धावणारे वाळू, खडी, मुरूम वाहनापासून धोका निर्माण झाला आहे.

खडी, मुरूम, वाळू डबर या जड वाहनांची वाहतूक बंद करावी व ही वाहने मख्य रस्त्याने वाहतूक करण्यास भाग पाडावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते राजेंद्र पानसरे यांची पोलिस विभागाकडे केली आहे. वरील जड वाहने ही विजय हॉटेल पासून निघून अप्पर पोलिस अधीक्षक यांचे निवास स्थानासमोरून जोराने जातात. खिलारी वस्तीकडील रस्त्याने लक्ष्मी त्र्यंबक कार्यालयाकडून वाळू आणणेसाठी जातात व वाळू भरून पुनश्च या रस्त्याने बेलापूर रोडकडे जातात. वाळू वाहतुकीचा परवाना ट्रक धारकाकडे असेल तर त्यांनी मुख्य रस्त्याने भरलेली वाहने नेणे आवश्यक आहे. परंतु ते छोट्या रस्त्याने धावतात.

कांदा मार्केट, खिलारी वस्ती, शेळके आय हॉस्पिटल, कौसल्यानगर परिसरात सकाळ व संध्याकाळच्या वेळेत जेष्ठ नागरीक, महिला, पुरूष दररोज वॉकींगसाठी जात असतात या परिसरातून वाळूची वाहने जोराने धावतात. त्यामुळे जेष्ठांचे अपघात होण्याची शक्यता आहे. पोलिसांनी या रस्त्याला दररोज पाहणी करून वेगाने धावणारे वाहनांवर कारवाई करणे गरजेचे आहे.




### शासकीय अधिकारी नेमके करतात काय?

अप्पर पोलिस अधीक्षक निवासस्थानकाजवळ बंदोबस्तासाठी पोलिस असतात. त्यांचे समोरून वरील जड वाहने धावत असतांनाही पोलिस कर्मचारी कोणतीही कारवाई करीत नाही. वाहनाची कागदपत्रे, वाहन चालकाचे लायसन्स व वाळू डबर वाहतुकीचे परवाने आहेत किंवा नाहीत याची तपासणी करून जड वाहतुकीस रस्त्याने जाण्यास मनाई करून मुख्य रस्त्याने वाहतूक करण्याची सूचना द्यावी, अशी मागणी राजेंद्र पानसरे यांनी केली आहे.

# टाकळी ढोकेश्वरला हिंदी अध्यापक कार्यशाळा




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील हिंदी अध्यापकांसाठीची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

नगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर महाविद्यालय, पुणे येथील महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा व पारनेर पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील हिंदी विषयाच्या शिक्षकांसाठी अध्यापक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर हे होते. ही कार्यशाळा पारनेर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये हिंदी विषयाचे लेखन वाचन, तर्कशिलता व प्रचार प्रसार व्हावा, यासाठीचे प्रशिक्षण हिंदी विषयाच्या शिक्षकांना देण्यात आले. या प्रशिक्षणात महाराष्ट्र राष्ट्र भाषा सभेच्या कार्याध्यक्षा डॉ. निला बोरवणकर, रविकीरण गळंगे, सुचित्रा कुलकर्णी, प्रा. ज्ञानेश्वर सोनार, श्रीपाद भोंग,गट शिक्षण अधिकारी कांतीलाल ढवळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे उद्घाटन नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे गव्हरनिंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. अरविंद गिते यांनीही मार्गदर्शन केले.पारनेर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील हिंदी विषयाच्या ७० हुन अधिक शिक्षकांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा विरेंद्र धनशेट्टी, प्रा लक्ष्मण कोठावळे, डॉ. विजय सुरोशी व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन डॉ. एकनाथ जाधव यांनी काम पाहिले.

# सोयाबीनची पाने पडताहेत पिवळी; शेतकऱ्यांमध्ये चिंता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांवरील संकटाची मालिका संपता संपत नसून सुरुवातीला पावसाने शेतकऱ्यांना वेठीस धरले. हवामान खात्याच्या २० जूननंतरच्या दमदार पावसाचा अंदाजावर विश्वास ठेवून पेरणीच्या कामाने गती घेतली, मात्र, मोठ्या विश्रांतीनंतर पाऊस सुरू झाला. आता उगवलेल्या सोयाबीनची पाने पिवळी पडत असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीत चांगली वाढ झाली आहे.

सुरुवातीपासूनच सोयाबीन उत्पादक शेतकरी वेगवेगळ्या समस्यांमुळे हैराण झाले आहेत. अंकुरलेल्या सोयाबीनच्या रोपांची पाने अचानक पिवळी पडू लागली. तसेच अनेक रोपं कोमेजू लागल्याने शेतकरी धास्तावले आहेत. यंदा सुरुवातीच्या काळात पावसाने दडी मारली. त्यात ३३४४ सारख्या सोयाबीन बियाण्यांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करण्यात आला. काही ठिकाणी बियाणं बोगस निघाल्याने सोयाबीन उगवलेच नाही. आता जे बियाणे उगवले आहे, ते अचानक पिवळे पडू लागले आहे. रोपं सुकत आहेत.सोयाबीनवर नेमका रोग तरी कोणता पडलाय, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे, आणि पिकाच्या नुकसानाची भीती आणखी वाढली आहे. सोयाबीनचे पीक सध्या वाढीच्या अवस्थेत आहे.

# सुप्यात 'सिस्पे' विरोधात ठेवीदार आक्रमक

## एजंटांना घेरावा, एजंटांसह कंपनीविरोधात गुन्हा दाखल करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : भरमसाठ परतावा देण्याच्या अमिषाला बळी पडल्याने सुपा परिसरातील सुमारे चारशे कोटी रूपये सिस्पे कंपनीत आता बुडाल्यात जमा आहेत. सुपा येथील सिस्पे कंपनीने गाशा गुंडाळला असून सुमारे चार महिन्यापासून फक्त लवकरच तुमचे पैसे मिळतील काळजी करू नका. अशा भूलथापा दिल्या जात आहेत. याविरोधात ठेवीदार आक्रमक झाले असून संबंधित एजंटांना जाब विचारला आहे. यानंतर सुपा पोलिस ठाण्यात जाऊन गुन्हा दाखल करणार असल्याची माहिती ठेवीदारांनी दिली.



सुपा शाखा १५ दिवसांपासून बंद असल्याने ठेवीदार हावलदिल झाले आहेत. दरम्यान त्यांनी एजंटांची भेट घेतली असता आश्वासनांच्या पलीकडे त्यांच्या हाती काहीही आले नाही. गुंतवणुकदार पैसे मागण्यासाठी चकरा मारत आहेत. मात्र, आता १५ दिवसांपासून कार्यालयच बंद झाल्याने अनेक जण याबाबत तक्रार दाखल करण्याच्या तयारीत आहेत.जेव्हा ठेवीदारांनी कार्यालयाला भेटी देण्यास सुरुवात केली असता कंपनीने कार्यालयाला कुलूप लावून पोबारा केल्याने ठेवीदारांनी एजंटांशी संपर्क साधल्याने त्यांनी कंपनीचे काम सुरू आहे, कंपनीचे नाव बदलले आहे. परकीय चलनात आपले शेअर्स बदलले जात आहेत, सॉफ्टवेअर दुरूस्ती सुरू आहे, अशी थातूर मातूर कारणे सांगत गुंतवणुकदारांना काही दिवस झुलवत ठेवले होते. आता मात्र कंपनीचे कार्यालय गेल्या १५ दिवसांपासून बंद झाल्याने आता पैसे मिळणार नाहीत, आपण बुडालो , अशी खात्री ठेवीदारांची झाली आहे. त्यामुळे काही ठेवीदार एकत्र येऊन तक्रार देण्याच्या तयारीत आहेत.याच कंपनीच्या नावाने पारनेर, श्रीगोंदे तालुक्या बरोबरच, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातूनही मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक झाली आहे व ती सुमारे ३ हजार ३०० कोटी रूपये आहे, अशी चर्चा सध्या सुरू आहे. याविरोधात ठेवीदार आक्रमक झाले असून याचा उद्रेक पारनेर शाखेच्या कार्यालयासमोर पहावयास मिळत आहे.

# भाषा समृद्धी म्हणजेच यशाची गुरुकिल्ली

## डॉ. संजय मालपाणी; 'मी माझ्या महाविद्यालयाचा' उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : आजच्या स्पर्धेच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही, तर भाषेवर प्रभुत्व, संवादकौशल्य, शब्दसंपत्ती आणि वैचारिक स्पष्टता या बाबी विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने यशाकडे घेऊन जातात, असे प्रतिपादन शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी केले आहे.

संगमनेर महाविद्यालयात युजीसी अंतर्गत महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष पदवी विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'मी माझ्या महाविद्यालयाचा' या उपक्रमांतर्गत विशेष मार्गदर्शन सत्रात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. रवींद्र ताशीलदार, उपप्राचार्य डॉ. प्रविण त्र्यंबके, उपक्रमप्रमुख डॉ. दिगंबर घोडके उपस्थित होते.

डॉ. मालपाणी म्हणाले, सध्याच्या काळात शुद्ध मराठीसोबत संवादक्षम इंग्रजी अवगत असणे ही काळाची गरज बनली आहे. सोशल मीडियाच्या आहारी जाऊन मौल्यवान वेळ वाया घालवण्याऐवजी विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वाचन करून शब्दसंपत्ती वाढवावी. इन्स्टाग्रामच्या रील्समधून मिळणारा क्षणिक आनंद शिक्षणाची गती कमी करत असतो. त्यामुळेच मोबाईलचा वापर आवश्यक मर्यादेत ठेवून डिजिटल तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करावा. महाविद्यालयातील तीन वर्षांचे शिक्षण हे केवळ परीक्षा पास होण्यासाठी न घेता आयुष्याला योग्य दिशा देणाऱ्या प्रक्रियेचा भाग समजून घेतले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुजाता शिरोडे यांनी तर आभार डॉ. दिगंबर घोडके यांनी मानले आणि सूत्रसंचालन डॉ. रोशन भगत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाखानिहाय समन्वयक डॉ. रुपेंद्र भागडे, प्रा. सुजाता शिरोडे, डॉ. संदीप वडघुले, प्रा. चिन्मय तिवारी, प्रा. सीताराम कवडे आणि सर्व समिती सदस्यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमासाठी प्रथम वर्षातील प्रवेशित विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांनी स्वतःला शोधावे

प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करत महाविद्यालयाच्या नाविन्यपूर्ण व विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची माहिती दिली. मी माझ्या महाविद्यालयाचा उपक्रमामागील उद्दिष्ट सांगतांना त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, विद्यार्थ्यांनी इथे केवळ शिक्षण घेण्यासाठीच नाही, तर स्वतःला शोधण्यासाठीही यावे. महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या उपक्रमांचा लाभघेऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा.

# 'प्रवरा गर्ल्स'चे जलतरण स्पर्धेत यश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथे प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर व ज्युनिअर वयोगट जलतरण स्पर्धा २०२५ मध्ये दमदार कामगिरी करत अनेक पदके मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली अशी माहीती प्राचार्या रेखा रत्नपारखी यांनी दिली.

यामध्ये गट नंबर एक मध्ये मारकंडे भाग्यश्री ईश्वर मारकंडे ५० मी. व १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक प्रथम क्रमांक, गौरी ज्ञानोबा मजरे ५० मी. व १०० मी. बटरफ्लाय प्रथम क्रमांक, राजश्री ईश्वर मारकंडे ५० मी. बॅक स्ट्रोक, ५० मी. व १०० मी. फ्री स्टाईलप्रथम क्रमांक, सावरी गणेश देविकर १०० मी. बॅक स्ट्रोक प्रथम, ५० मी. बॅक स्ट्रोक द्वितीय, गट दोन मध्ये औताडे धनश्री औताडे ५० मी. बटरफ्लाय तृतीय, अमृता कलांबे ५० मी. फ्री स्टाईल तृतीय गट तीन मध्ये अभिनवी जैन १०० मी. बॅक स्ट्रोक तृतीय, ऋधिमा सोनवणे १०० मी. फ्री स्टाईल तृतीय, रुद्राणी मोटे १०० मी. बटरफ्लाय द्वितीय, रजनीदिनी औटी १०० मी. ब्रेस्ट स्ट्रोक प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना क्रिडा अधिकारी सुचित्रा तांबे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.




## अतिखाणं होतंय?



भूक नसताना सतत खात राहणं हा एक विकार आहे. तो जगभरातल्या असंख्य लोकांना जडतो. पण अतिखाण्यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य धोक्यात येतं हे समजून घ्यायला हवं. भुकेपेक्षा अधिक खाल्ल्यानंतर मनात अपराधी भाव येतो. हे लक्षात घेता आहार आणि जीवनशैलीत साधे बदल करून हा विकार आटोक्यात ठेवता येतो. ✻ उपासमार करून घेऊ नका. आहारातून विशिष्ट पोषक घटक किंवा गट बाद करू नका. त्याऐवजी काही आरोग्यदायी बदल करा. फायबरयुक्त पदार्थ, फळं, हिरव्या भाज्या यांचं सेवन करा. जंक फूड टाळा. ते शक्य नसेल तर प्रमाण कमी करा. ✻ भरपूर पाणी प्या. पाण्याचं प्रमाण वाढवल्यामुळे वारंवार भूक लागत नाही. शरीरात कमी कॅलरी जातात. चयापचय क्रिया सुधारते. वजन कमी होतं. त्यामुळे शरीराचे संकेत ओळखा आणि वरचेवर पाणी प्या. ✻ पुरेशी झोप घ्या. झोपण्याच्या आणि उठण्याच्या वेळा निश्चित करा. त्या कटाक्षाने पाळा. ✻ ताण कमी करण्याचा प्रयत्न करा.

विचारा प्रश्न

## पित्ताशयातील खड्यांचे वाढते प्रमाण

आरोग्य विशेष

काही आजार किंवा रोगांची आपल्या शरीरामध्ये शांतपणे वाढ होत असते. ते आजार गंभीर टप्प्यामध्ये पोहोचेपर्यंत आपल्याला त्याची कल्पना सुद्धा येत नाही. त्यापैकीच एक समस्या म्हणजे पित्ताशयातील खडे. भारतात सुमारे सहा टक्के लोकांना पित्ताशयातील खड्यांचा त्रास आहे. त्यात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. वेळीच उपचार न केल्यास पित्ताशयातील खड्यांची समस्या गंभीर रुप धारण करू शकते. या समस्येवर वेळीच उपचार करणे गरजेचे आहे.

ओटीपोटाच्या उजव्या बाजूला यकृताच्या अगदी खाली एक लहान नाशपातीच्या आकाराचा अवयव असतो. त्याला पित्ताशय म्हणतात. सामान्य भाषेत त्याला पित्ताशयाची पिशवीसुद्धा म्हणतात. त्यात पित्त नावाचा एक पाचक द्रव असतो. तो लहान आतड्यामधले अन्न पचवण्यासाठी मदत करतो. काही व्यक्तींच्या शरीरात कोणतीही लक्षणे नसतानादेखील पित्ताचे खडे आढळतात, तर काहींना त्रासदायक वेदना होतात.



पित्तनलिकेमध्ये खडा अडकल्याने तिच्या बाजूचे स्नायू जोरात आकुंचित होतात. हा खडा पित्त सोडणाऱ्या वाहिनीला अडथळा आणतो. त्यामुळे ओटीपोटामध्ये तीव्र वेदना होऊ शकते. अशावेळी आपत्कालीन वैद्यकीय मदतीची आवश्यकता भासू शकते. शिवाय, पित्ताशयावर वारंवार होणारे हल्ले या अवयवाचे नुकसान करू शकतात आणि पित्त मूत्राशय आणि पित्त नलिका यामध्ये संसर्ग होण्याचा धोका वाढू शकतो. या बाबतीत लहान खडे मोठ्या खड्यांपेक्षा अधिक धोकादायक असू शकतात. कारण त्यांच्यात निसटण्याची आणि पित्त नलिकेमध्ये अडथळा निर्माण करण्याची प्रवृत्ती जास्त असते.

पित्ताशयातील खड्यांमुळे पित्तनलिकेत अडथळे निर्माण होऊन अवरोधक कावीळची समस्या निर्माण होऊ शकते. ही स्थिती त्वचा आणि डोळे पिवळसर होणे, यकृताच्या कार्यातील बिघाड दर्शवते. पित्त नलिकेतील दीर्घकालीन अडथळा हा यकृताच्या नुकसानीस कारणीभूत ठरू शकतो. परिणामी, लिव्हर सिरोसिस होण्याचा धोका वाढवू शकतो.

उपचार न केलेले पित्ताशयातील खडे अधिक गंभीर समस्या निर्माण करतात. स्वादुपिंडाचा दाह ही त्यातीलच एक समस्या. पित्ताशयाचे खडे स्वादुपिंडाच्या नलिका अवरोधित करतात तेव्हा स्वादुपिंडाचा दाह होतो. त्यामुळे स्वादुपिंडाची जळजळ होते. या स्थितीमुळे ओटीपोटात तीव्र वेदना, मळमळ, उलट्या आणि गंभीर प्रकरणांमध्ये अवयव निकामी होऊ शकतात. काही वेळेस ही स्थिती जीवघेणी ठरू शकते. गॅलस्टोन पॅन्क्रियाटायटीसला त्वरित वैद्यकीय मदतीची आवश्यकता असते. योग्य काळजी आणि उपचारांसाठी हॉस्पिटलायझेशनची आवश्यकता भासू शकते.



पित्त मूत्राशय पचनास मदत करण्यासाठी पित्त संचयित करण्यात आणि ते सोडण्याची महत्त्वाची भूमिका बजावते; परंतु त्याच्या अनुपस्थितीमुळे सामान्यत: कोणत्याही मोठ्या पचन समस्या उद्भवत नाहीत. ओटीपोटात दुखणे, मळमळ, उलट्या आणि कावीळ यासारखी लक्षणे अनुभवणाऱ्या व्यक्तींनी त्वरीत वैद्यकीय तपासणी करणे महत्त्वाचे आहे. निदानाकरिता रक्त कार्य, अल्ट्रासाऊंड, सीटी स्कॅन किंवा एमआरआय सारख्या इमेजिंग चाचण्यांचा समावेश होतो. शेवटी, उपचार न केलेले पित्ताशयातील खडे आरोग्य आणि कल्याणासाठी धोकादायक ठरतात. पित्ताशय काढून टाकण्याबद्दलचे गैरसमज दूर करणे आणि योग्य वैद्यकीय काळजी घेणे महत्त्वाचे ठरते.

## कार्डिॲक अरेस्ट की हृदयविकाराचा झटका?

काळजी घ्यावी

कार्डिॲक अरेस्ट आणि हृदयविकाराचा झटका या दोन्ही गोष्टी एकच आहेत असा अनेकांचा समज असतो. पण दोन्ही विकारांची लक्षणं सारखी असली तरी त्यांचं स्वरूप पूर्णपणे भिन्न आहे हे लक्षात घ्यायला हवं. कार्डिॲक अरेस्ट झालेल्या व्यक्तीच्या हृदयाचं कार्य थांबतं. अचानक हृदयगती थांबते. यामुळे पंम्पिंगमध्ये अडथळे येऊन शरीरातल्या विविध अवयवांना होणाऱ्या रक्तपुरवठ्यात बाधा येते. कार्डिॲक अरेस्टवर तातडीने उपचार होणं गरजेचं असतं अन्यथा रूग्णाचा मृत्यू होऊ शकतो. चक्कर येणं, हृदयगती वाढणं, हृदयगतीची लय बिघडणं, अचानक कोसळणं, छातीत दुखणं, उलट्या, थकवा आणि अशक्तपणा अशी लक्षणं दिसली तर तातडीने डॉक्टरांकडे धाव घ्यायला हवी. शुद्ध हरपणं, नाडी न लागणं, धाप लागणं अशी लक्षणं दिसली तर अजिबात वेळ वाया घालवू नये.



हृदयाला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात अडथळे आले तर हृदयविकाराचा झटका येतो. हृदयाला रक्ताबरोबर ऑक्सिजनचा पुरवठाही होत नाही. यामुळे हृदयाचे स्नायू मृतवत होऊ लागतात. हे हृदयविकाराचे काही संकेत असतात. याची काही लक्षणं दिसून येतात. छातीत दुखणं, धाप लागणं, उलट्या होणं, घाम येणं, शरीराच्या वरच्या भागात अस्वस्थता जाणवणं, अचानक चक्कर येणं हे हृदयविकाराच्या झटक्याचे संकेत असू शकतात.

या दोन विकारांमधला समान धागा म्हणजे त्यांची लक्षणं. धमन्यांमधून हृदयाला रक्तपुरवठा होताना अडथळे आले तर हृदयविकाराचा झटका येतो. या अडथळ्यांमुळे हृदयाला रक्त आणि ऑक्सिजनचा पुरवठा होत नाही. कार्डिॲक अरेस्टमध्ये विशिष्ट कारणांमुळे हृदयाचं कार्य अचानक थांबतं. यावेळी हृदयगती वाढते किंवा हृदयाचे ठोके अनियमित पडू लागतात. कार्डिॲक अरेस्टमध्ये अवघ्या काही मिनिटात रूग्णाचा मृत्यू होऊ शकतो. त्यामुळे त्याला तातडीने औषधोपचार मिळणं गरजेचं असतं.

वजन नियंत्रणात ठेवणं, नियमित व्यायाम, चरबीयुक्त पदार्थांचं प्रमाण कमी करणं, आहारात फळं आणि भाज्यांचा समावेश करणं, शांत झोप घेणं, मद्यपान–धूम्रपान पूर्णपणे टाळणं, ताण न घेणं आदी उपायांनी हृदयविकाराला आळा घालणं शक्य होतं.

## उभं राहून काम करताय?

आपण कुठे चुकतो?

बैठी जीवनशैली आरोग्यासाठी धोकादायक असल्याने अनेक कार्यालयांमध्ये स्टँडिंग डेस्कचा पर्याय स्वीकारण्यात येत आहे. स्टँडिंग डेस्क म्हणजे उभं राहून काम करणं. यामुळे बसून काम करण्याने उद्‌भवणारे धोके कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पण प्रत्यक्षात उभं राहून काम केल्यामुळे कोणतेही लाभ होत नसल्याचंही समोर आलं आहे. उभं राहिल्याने आपली शारीरिक हालचाल होत असल्याचं लोकांना वाटतं. पण प्रत्यक्षात ते चुकीचं आहे.




एका जागेवर ८ ते ९ तास बसून आणि त्यातही एकाच स्थितीत राहून काम केल्याने पाठीतल्या चकत्यांवरचा ताण वाढून त्या फगीर बनतात. त्यामुळे उभं राहून काम करण्याचा पर्याय देण्यात आला. पण पूर्ण दिवस एकाच स्थितीत उभं राहणं पाठीचा कणा आणि पाठ दोहोंसाठीही चांगलं नसतं. उभं राहण्याच्या स्थितीतही शरीराची फारशी हालचाल होत नाही. जर्नल ऑफ एपिडेमिओलॉजीत छापून आलेल्या संशोधनानुसार उभं राहून काम करणाऱ्यांमध्ये हृदयाशी संबंधित विकारांचा, गुंतागुंतींचा धोका जास्त असतो.

म्हणूनच शरीराचा ताठरपणा कमी करण्यासाठी थोड्या हालचालीची आवश्यकता असते हे सतत उभं राहून काम करणाऱ्यांनी समजून घ्यायला हवं. पूर्ण वेळ एकाच स्थितीत उभं राहण्यापेक्षा फोनवर बोलताना किंवा अधूनमधून थोडं चालायला हवं.

## मुतखड्याचा विकार आहे?

व्याधी विचार

अनेकांना मूतखड्याची समस्या भेडसावते. हा अत्यंत वेदनादायी विकार आहे. लक्षणं, कारणं आणि रंग यावरून आयुर्वेदाने मूतखड्याची चार प्रकारांमध्ये विभागणी केली आहे. वाताशमारी, पित्ताशमारी, कफाशमारी आणि शुक्राशामरी असे हे चार प्रकार आहेत. वात, कप आणि पित्त या प्रवृत्तींवर आयुर्वेदाचा भर असतो. वाताचं असंतुलन कफ वाळण्यास कारणीभूत ठरतं आणि मूतखडा विकसित होतो, असं आयुर्वेद सांगतं. आयुर्वेदानुसार योग्य आहार, प्रतिबंधात्मक उपाय आणि भरपूर पाणी पिणं या उपायांनी छोट्या आकाराचे खडे पडून जातात. वाळूच्या कणापेक्षा मोठ्या आकाराचे खडे आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि औषधांनी नष्ट होऊ शकतात. पण त्यापेक्षा मोठ्या आकाराचे खडे काढून टाकण्यासाठी फ्लश थेरपी किंवा शस्त्रक्रिया करून घ्यावी लागते. लिंबूपाणी, ताक, नारळ पाणी, भोपळ्याचं सूप आणि प्रमाणात मोसंबीचा रस पिऊन छोट्या आकाराचा मूतखडा बरा होऊ शकतो. दिवसातून दोन वेळा अनोशा पोटी वेलची घातलेला ऊसाचा रस पिणं, ऊस आणि दुधासोबत तुळशीच्या बिया, मधासोबत जिरं खाणं, कलिंगडाचं सेवन, आहारातून आवळा पूड घेणं अशा उपायांनी या विकाराला आळा घालता येतो. वेळेत जेवणं, उठल्यावर गरम पाणी पिणं, टोमॅटो, वांगं, चिकू, दुग्धजन्य पदार्थ, मैद्याचे पदार्थ न खाणं या नियमांचं पालन करायला हवं.



## अशी आहे एनएस१ चाचणी

आरोग्य वेध

डेंग्यू हा एक घातक विकार आहे. दरवर्षी डेंग्यूरुग्णांमध्ये वाढ नोंदवली जाणं हे धोक्याचं लक्षण आहे. डेंग्यूची प्राथमिक लक्षणं फ्लूसारखी असली तरी प्रसंगी ती प्राणघातक ठरत असल्याने रूग्णाला रूग्णालयात दाखल करावं लागू शकतं. तीव्र स्वरूपाचा ताप, अंगदुखी, पुरळ उठणं, डोळ्यांच्या मागच्या भागात वेदना जाणवणं, भूक मंदावणं, उलट्या, मळमळ अशा एकसारख्या लक्षणांमुळे डेंग्यू आणि फ्लूमधला फरक ओळखणं खूप कठीण होऊन बसतं. ही लक्षणं दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकून राहिली तर काही चाचण्यांनी या विकाराचं निदान होऊ शकतं. योग्य उपचार आणि उपायांनी डेंग्यूला आळा घालता येऊ शकतो. अशा परिस्थितीत एनएस १ चाचणी अत्यंत प्रभावी आणि उपयुक्त ठरू शकते.




अँटीबॉडीज आणि एनएस १ या दोन चाचण्यांनी डेंग्यूचं निदान केलं जातं. एनएस १ ही इम्युनोग्लोबिन अँटीजेन चाचणी आहे. अँटीजेन म्हणजे अँटीबॉडीज निर्माण करण्यासाठी शरीराला उत्तेजित करणारा पदार्थ. नवा अँटीजेन शरीरात शिरल्यानंतर रोगप्रतिकारक यंत्रणा त्याबद्दल जाणून घेते आणि त्याचे गुणधर्म अंगिकारून भविष्यातल्या हल्ल्याच्या दृष्टीने स्वत:ला तयार करते. त्यामुळे डेंग्यूचं अचूक निदान करण्याच्या दृष्टीने ही चाचणी योग्य ठरते. दुसरीकडे डेंग्यूच्या विषाणूंना प्रतिसाद म्हणून अँटीबॉडीजचा होणारा विकास जाणून घेण्यासाठी अँटीबॉडी चाचणी करण्याचा सल्ला दिला जातो. पण संसर्ग झाल्यानंतर साधारण पाचव्या दिवशी अँटीबॉडिजच्या निर्मितीला सुरूवात होते. त्यामुळे या चाचणीतून योग्य निदान होण्याची शाश्वती देता येत नाही. म्हणूनच एनएस १ ही सर्व दृष्टीने योग्य चाचणी आहे.

तीव्र स्वरूपाचा ताप येत असेल तर पहिल्याच दिवशी एनएस १ चाचणी करून डेंग्यूचं निदान होऊ शकतं. आयजीएम सारख्या अँटीबॉडींचं निदान संसर्गानंतर पाच ते दहा दिवसांनी होतं. पण एनएस१ या अँटीजेनचं निदान पहिल्या दिवशीही होऊ शकतं. त्यामुळे रोगाचं वेळेत निदान होऊन तातडीने उपचारांना सुरूवात करता येते. सहाजिकच रोगाची गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता कमी होते. आयजीएम अँटीबॉडीचं निदान सध्याच्या जंतूसंसर्गाची शक्यता व्यक्त करतं किंवा नुकत्याच झालेल्या संसर्गाकडे अंगुलीनिर्देश करतं. एनएस१ अँटीजेन फक्त डेंग्यूशी संबंधित असतं तर इतर अँटीबॉडीजचा संबंध डेंग्यूशी साधर्म्य साधणाऱ्या इतर विकारांशीही असू शकतो.

## वंध्यत्वाची वाढती समस्या

जाणून घ्या


आपल्या आजूबाजूला अनेक जोडपी वंध्यत्वाशी झुंज देत असल्याचे पहायला मिळते. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे उशिराने होणारा विवाह. पुरुष आणि स्त्रिया त्यांच्या विशीच्या सुरुवातीस किंवा तिशीच्या आत लग्न करायचे ते दिवस आता गेले. आता शिक्षण आणि करिअरमुळे तिशीनंतर लग्न करण्यास तरुणांची पसंती मिळत आहे. यशस्वी आणि आर्थिकदृष्ट्या सुरक्षित असणे आता पुरुष आणि महिलांसाठी महत्त्वाचे ठरत आहे. उशिराने झालेल्या विवाहामुळे वंध्यत्वाची समस्या उद्भवू शकते.

उशिरा विवाह केल्यामुळे दहा टक्क्यांपेक्षा जास्त जोडप्यांना वंध्यत्वाचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे केवळ मद्यपान, लठ्ठपणा, एंडोमेट्रिओसिस, लैंगिक संक्रमित रोग (एसटीडी) किंवा वय एवढेच नाही, तर उशिरा होणारा विवाहदेखील प्रजननक्षमतेला हानी पोहोचवतो. वय वाढत जाते तशी गर्भधारणेची शक्यता खूपच कमी होते. लैंगिक संभोग कमी होणे, गर्भाशयासंबंधी समस्या, स्त्रीबीजांची संख्या कमी होणे आणि गुणवत्ता खराब होणे यामुळे हे घडते. महिलांना २५ ते ३५ वर्षांच्या दरम्यान गर्भधारणेचा सल्ला दिला जातो. अनेक स्त्रिया भविष्यात उशिराने मूल होण्यासाठी पर्याय म्हणून एग फ्रिझिंग आणि सरोगसीची निवड करत आहेत. प्रजनन क्षमता कमी होणे ही केवळ स्त्रियांचीच नव्हे तर पुरुषाचीही समस्या आहे. वयानुसार पुरुषांची शुक्राणुंची संख्या कमी होऊ शकते. परिणामी, प्रजनन क्षमतादेखील हळूहळू कमी होते आणि गर्भधारणेत अडथळा निर्माण करू शकते. गर्भधारणा करू इच्छिणाऱ्या जोडप्यांसाठी पर्यायी प्रजनन उपचारांची निवड करणे हा एक आशादायक पर्याय आहे. वंध्यत्वासाठी इंट्रायूटरिन इन्सेमिनेशन (आययूआय) उपचार स्त्रिया आणि जोडप्यांना मदत करू शकतात. इन विट्रो फर्टिलायझेशन, इंट्रासाइटोप्लाज्मिक स्पर्म इंजेक्शन आणि एग फ्रिझिंगसारख्या इतर प्रक्रियांचा उल्लेख केला आहे. एखाद्या तज्ज्ञाचा सल्ला घेणे आणि आपल्यासाठी योग्य पर्याय निवडणे गरजेचे आहे.

### ॥ नवसंशोधन ॥

#### जागरण ठरू शकतं घातक!


निशाचरांमध्ये हृदयविकार आणि टाईप २ मधुमेह जडण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. रात्री जागरण करून उशिरा उठणाऱ्यांना लवकर उठणाऱ्यांच्या तुलनेत मधुमेह जडण्याचा धोका अडीच पटींनी जास्त असतो. निशाचर अनारोग्यदायी आहार घेतात. मद्य, गोड पदार्थ, जंक फूड आदींच्या सेवनामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होतो. त्यांच्या रक्तातली साखरेची पातळी वाढलेली असते. याचा चयापचय क्रियेवर नकारात्मक परिणाम होतो. सुटीच्या दिवशीही जास्त वेळ झोपण्याचाही आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.



### ॥ डोळ्यांचं आरोग्य ॥

#### डोळे चोळू नका

डोळ्यात कचरा गेल्यावर खूप अस्वस्थ वाटतं. कण काढून टाकण्यासाठी आपण डोळा चोळतो. पण ही पद्धत अयोग्य आहे. हातांवर बरेच जंतू असतात. धूळ आणि प्रदूषित कण असतात. म्हणूनच त्याच हातांनी डोळा चोळणं घातक ठरू शकतं. डोळ्यांचा कोरडेपणा कमी करण्यासाठी कापसाच्या मदतीने डोळ्याभोवती खोबरेल तेल लावा. पूर्णपणे आराम मिळवण्यासाठी तुम्ही दिवसातून दोनदा याचा वापर करू शकता. पण डोळे दुखत असतील तर डॉक्टरांकडे जाणं हाच योग्य उपाय आहे.



### ॥ दंतकथा ॥

#### वेदनाशामक औषधांमुळे...

अक्कलदाढ काढून टाकल्यानंतर रुग्णांना ओपिओइड नावाचं वेदनाशामक औषध दिलं जातं. पण या औषधांचं व्यसन लागू शकतं, असं संशोधक सांगतात. एका वर्षात काही दशलक्ष लोकांवर अक्कलदाढ काढून टाकण्याची शस्त्रक्रिया केली जाते. त्यानंतर होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी वेदनाशामक औषधं दिली जातात. त्यातही ओपिओइड देण्याचं प्रमाण बरंच जास्त आहे. मात्र मुलांपेक्षा मुली आणि महिलांना या औषधाचं व्यसन लागण्याची शक्यता जास्त असते, असंही संशोधनात आढळून आलं आहे. त्यामुळे दंततज्ज्ञांनी वेदनाशामक औषधं देताना विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.



### ॥ आजीबाईंचा बटवा ॥

#### फायबरयुक्त आहार मोलाचा

पचनसंस्था सुरळीत चालण्यासाठी तंतुमय पदार्थांचे सेवन वाढवायला हवे. फळे, भाजीपाला यामध्ये तंतुमय पदार्थ भरपूर प्रमाणात असतात. तज्ज्ञांच्या मते जास्त तंतुमय पदार्थ असलेली फळे, भाजीपाला यांचा रोजच्या आहारात समावेश केल्यामुळे वजन कमी होते तसेच कोलेस्टेरॉल कमी झाल्याने रक्तदाब विकारामध्ये सुधारणा होते. रोजच्या आहारात २५ ग्रॅम किंवा त्यापेक्षा जास्त उपयुक्त तंतुमय पदार्थ गरजेचे आहेत. आपल्याकडे डाळींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. डाळींचे सूप्स, आमटी हे पदार्थ घराघरामध्ये तयार होतात. फायबर युक्त आहारासाठी डाळी हा उत्तम सोर्स आहे.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11